गुरुवार, २० ऑक्टोबर २०२२

# राम प्रहर

वर्ष १५ ◆ अंक ९३
www.ramprahar.com
पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## राज्य सरकारचा 'आनंदाचा शिधा' वाटपासाठी सज्ज



**मुंबई :** राज्य सरकार दिवाळी सणासाठी शिधापत्रिकाधारकांना शंभर रुपयांमध्ये किराणा सामान देणार आहे. काही ठिकाणी हे किराणा किट दाखल झाले असून गुरुवार (दि. २०)पासून या किटचे वाटप करण्यात येणार आहे. या किटमध्ये चार वस्तू देण्यात येणार आहेत. यात प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि एक लिटर पामतेलाचा समावेश आहे. हा उपक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. त्यामुळे किटच्या या तिघांचे पुड्यावर फोटो आहेत, तर या किटला आनंदाचा शिधा असे नाव देण्यात आले आहे. यामुळे यंदा राज्यातील सर्वसामान्य जनतेची दिवाळीही गोड होणार आहे.


**अंतरंग**

उद्धव ठाकरे यांच्यासाठी रामाच्या जागेवर राहुल!/२

माणगाव उपजिल्हा रुग्णालयात केली जातेय रुग्णांची लूट/७

राष्ट्रीय कराटे चॅम्पियनशीपमध्ये 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे सुयश/८


## आरसीएफच्या अलिबाग प्रकल्पात भीषण स्फोट

# तीन जणांचा मृत्यू, तिघे गंभीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अ‍ॅण्ड फर्टीलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) कंपनीच्या अलिबागजवळील थळ-वायशेत येथील प्रकल्पात स्टीम जनरेशन प्लांटमध्ये भीषण स्फोट होऊन तीन जणांचा मृत्यू, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना नवी मुंबईतील ऐरोली येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही दुर्घटना बुधवारी (दि. १९) सायंकाळी ५च्या सुमारास घडली.





(छाया : जितू शिगवण)

थळ येथील आरसीएफ प्रकल्पातील स्टीम जनरेशन प्लांटमध्ये नवीन वातानुकूलित यंत्रणा बसविण्याचे काम सुरू होते. ॲरिस्टो ट्रोटल नामक कंपनीला ही यंत्रणा बदलण्याचे काम देण्यात आले होते. कंपनीमार्फत वातानुकूलन यंत्रणा बसविताना संध्याकाळी ५च्या सुमारास मोठा स्फोट झाला. यात तीन जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये आरसीएफ कर्मचारी अंकित शर्मा (२७), कंत्राटी कर्मचारी दिलशाद अस्लम इद्रिसी (२९) व फैजान शेख (वय ३३, दोघेही रा. कुर्ला, मुंबई) यांचा समावेश आहे, तर साहिद मोहम्मद सिद्दीकी (२३), जितेंद्र शेळके (वय ३४) व अतिंदर मनोज हे तिघे जखमी झाले आहेत. जखमींना आरसीएफ कंपनीच्या कुरूळ येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, पण त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना नवी मुंबईतील ऐरोली येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

या स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की तो आजूबाजूच्या गावांतही ऐकायला आला. सुदैवाने वायुगळती झाली नाही. या स्फोटाबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.



## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते
# सुगंधी उटणे वाटपाचा शुभारंभ
### भाजप युवा नेते केदार भगत व मित्र परिवाराचा उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

दिवाळी सणानिमित्त भाजपचे युवा नेते केदार भगत आणि मित्र परिवाराच्या माध्यमातून सुगंधी उटण्याचे वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमाची सुरुवात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. १९) करण्यात आली.

या वेळी सुमित दसवते, पत्रकार केवल महाडिक, शेषनाथ गायकर, योगेश साळवी, हर्षद गडगे, भावेश शिंदे, संकेत दसवते, नितेश भगत, रवी परचे, ब्रिजेश बहिरा, संतोष वर्तले, यज्ञेश पाटील आदी उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्वखर्चातून कानपोलीत महिला मंडळासाठी हॉल



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

(छाया : अनिल कोकाटे)

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन
### गाव विकासासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वांनी एकत्र येऊन काम केल्यास गावाचा विकास होईल, असे प्रतिपादन भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी बुधवारी (दि. १९) कानपोली येथे केले. भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेल तालुक्यात अनेक विकासकामे सुरू आहेत. त्या अंतर्गत कानपोली गावात त्यांच्या स्वखर्चातून महिला ग्राम संघ मंडळासाठी हॉल बांधण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

कानपोली गावात बांधण्यात येणाऱ्या हॉलच्या भूमिपूजन कार्यक्रमास भाजप नेते एकनाथ देशेकर, पं. स. सदस्य तथा भाजप महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, चिंध्रण ग्रामपंचायतीच्या सरपंच कमला देशेकर, कानपोली ग्रामपंचायतीच्या सदस्य संगीता पाटील, बाळकृष्ण पाटील, आत्माराम खानावकर, बाबुराव पाटील, परशुराम पाटील, मधुकर पाटील, लक्ष्मण मते, आत्माराम पाटील, अंबो पाटील, निवृत्ती पाटील, सावळाराम मते, गोमा पाटील, अंकुश जोशी, अरुण पाटील, राम चौधरी, राधेशाम चव्हाण, दिनेश पाटील, प्रदीप मते, संतोष पाटील, अक्षय पाटील, राम पाटील, विराज पाटील, रोहित पाटील, प्रल्हाद साळुंखे, हनुमान साळुंखे, शोभा मते, सुरेखा जोशी, धर्मा निरगुडा, शोभा भला यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, या वेळी भाजप नेते एकनाथ देशेकर यांच्या माध्यमातून कानपोली गावात दिवाळी सणानिमित्त उटण्याचे वाटप करण्यात आले.

## निवडक

### काँग्रेस अध्यक्षपदी मल्लिकार्जुन खरगे ; शशी थरूर पराभूत

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि गांधी घराण्याचे निकटवर्तीय मल्लिकार्जुन खरगे यांची पक्षाचे नवे अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. त्यांच्याविरोधात निवडणूक लढवणारे खासदार शशी थरूर पराभूत झाले आहेत. खरगेंना सात हजार ८९७, तर थरूर यांना एक हजार ७२ मते पडली.

### राजधानी मुंबईत तीन ठिकाणी बॉम्बस्फोट घडविण्याची धमकी

**मुंबई :** अंधेरी येथील इन्फिनिटी मॉल, जुहू पीव्हीआर मॉल आणि सहारा हॉटेल या तीन ठिकाणी बॉम्बस्फोट घडविणार असल्याची धमकी बुधवारी (दि. १९) एका अज्ञात व्यक्तीने फोनवरून पोलिसांना दिली. त्यानंतर यंत्रणा सतर्क झाली आहे.

# पनवेलमध्ये रविवारी 'दिवाळी पहाट'

### सुश्राव्य गाण्यांची सुरेल मैफिल रंगणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही पनवेलमध्ये सुश्राव्य गाण्यांची सुरेल मैफिल असलेल्या दिवाळी पहाट संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (दि. २३) सकाळी ६ वाजता पनवेल शहरातील वडाळे तलाव येथे हा कार्यक्रम होणार आहे.

यंदा दिवाळी पहाट कार्यक्रमाचे सहावे वर्ष असून यामध्ये 'झी मराठी लिटिल चॅम्प' फेम प्रथमेश लघाटे, मुग्धा वैशंपायन, शमिका भिडे तसेच 'सूर नवा ध्यास नवा' स्पर्धक प्रणय पवार ही प्रसिद्ध गायक मंडळी सुश्राव्य गाण्यांची मैफिल सादर करणार आहेत, तर या कार्यक्रमाचे निवेदन प्रसिद्ध निवेदिका धनश्री दामले करणार आहेत. दरवर्षी संगीत रसिकांचा या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असतो.

या कार्यक्रमासाठी प्रवेश निःशुल्क असून प्रवेशिकेसाठी रोहित जगताप (८६९१९३०७०९), गौरव कांडपिळे (९९२०८६८००८) किंवा अभिषेक भोपी (९८२०७०२०४३) यांच्याशी संपर्क साधावा तसेच या सुरेल मैफलीचा संगीत रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले आहे.

# बालनाट्यविषयक सहविचार सभा उत्साहात

### प्रसिद्ध दिग्दर्शक राजू तुलालवार यांनी केले मार्गदर्शन





(छाया : संकेत भोईर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दोन वर्षांच्या कठीण काळानंतर शाळा नव्या उत्साहात सुरू झाल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या उत्साहाला आणि ऊर्जेला एक नवी दिशा देण्याचा संकल्प श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल यांनी केला असून त्या अनुषंगाने पनवेल मार्केट यार्ड येथील मंडळाच्या सभागृहात मंगळवारी (दि. १८) बालनाट्यविषयक सहविचार सभा उत्साहात झाली. या वेळी बालनाट्यांचे प्रसिद्ध दिग्दर्शक राजू तुलालवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रत्येक बालकात उपजतच एक नट दडलेला असतो. त्यामुळे बालनाट्य निर्माण करणाऱ्या मार्गदर्शकांकडून त्यांच्या शंकांचे निरसन आणि प्रोत्साहन देण्यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेलचे शाखेचे उपाध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या संकल्पनेनुसार या सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. (पान २ वर..)

# दिवाळीनिमित्त बाजारपेठा सजल्या

### पर्यावरणपूरक आकाशकंदिलांना ग्राहकांची पसंती



(छाया : दिनेश पवार)

**उरण : वार्ताहर**

दिवाळी सण जवळ येत असल्याने विविध वस्तूंनी बाजारपेठा सजल्या असून अनेकांची खरेदीसाठी लगबग सुरू आहे. प्रकाशाचा उत्सव असलेल्या दीपावलीनिमित्त आकाशकंदील, पणत्या लक्ष वेधून घेत आहेत. चिनी बनावटीचा माल तकलादू आणि प्रदूषण वाढवित असल्याने यंदा पर्यावरणपूरक आकाशकंदील, पारंपरिक पणत्यांना मागणी दिसून येत आहे.

विविध वस्तू खरेदीसाठी बाजारात ग्राहकांची मोठी गर्दी होऊ लागली आहे. त्यामुळे व्यावसायिकांमध्ये चैतन्य निर्माण झाले आहे. बाजारात आकर्षक आकाशकंदील, पणत्या, दिवे दुकानदारांनी विक्रीसाठी ठेवलेले आहेत. यंदा ग्राहकांनी चिनी बनावटीच्या आणि प्लास्टिकच्या आकाशकंदिलांकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक आकाशकंदील तयार करणाऱ्या उरणच्या गावंड कुटुंबीयांकडे मागणी सातत्याने वाढत आहे. चायना मेडपेक्षा देशी बनावटीच्या आकाशकंदिलांना जास्त पसंती मिळत नसल्याचे विक्रेते म्हात्रे यांनी सांगितले.

रंगीबेरंगी, कापडी, हॉलोग्राफी, मार्बल पेपर यासह फोल्डिंगचे असंख्य प्रकारचे आकर्षक आकाशकंदील विक्रीसाठी बाजारात दाखल झाले आहे. त्यात पॅराशूट कंदील, आकाशदीप, फायर बॉल, कलश, टोमॅटो बॉल, कापडी आकाशकंदिलांना चांगली मागणी असून ५० ते ५०० रुपयांपर्यंत भाव आहे. मिनी आकाशकंदील २० रुपयांपासून महाआकाशकंदील जवळपास एक हजार रुपयांपर्यंत आहे.

मातीच्या पारंपारिक पणत्यांनाही मागणी असून एक डझन ५० रुपये या दराने आम्ही विकतो, असे पूजा दीपक मांडेलकर यांनी सांगितले, तर किल्ल्यावर ठेवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज, मावळे यांच्या प्रतिकृतीही उपलब्ध असून त्यांचा दर २० रुपयांपासून ५० रुपयांपर्यंत आहे. बच्चेकंपनी मोठ्या प्रमाणात ते विकत घेत आहेत, असे सुरेखा कुंभार यांनी सांगितले.




# उद्धव ठाकरेंसाठी रामाच्या जागेवर राहुल!

## भाजप प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रत्येक नेत्याला मातोश्रीवर येण्यासाठी भाग पाडणारा बाळासाहेबांचा आदरयुक्त दबदबा उद्धव ठाकरेंनी रसातळाला पोहचवला आहे. पक्ष, संघटना किंवा कार्यकर्त्यांसाठी कधीही घराबाहेर न पडलेले उद्धव ठाकरे आता राहुल गांधींच्या पदयात्रेसाठी पायघड्या घालण्यासाठी घराबाहेर पडणार हा उद्धव ठाकरे यांच्यावर काळाने उगवलेला सूड आहे, अशी खोचक टीका प्रदेश भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी बुधवारी (दि. १९) केली.



भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे नूतन अध्यक्ष नरेंद्र पाटील या वेळी उपस्थित होते. उपाध्ये म्हणाले की, याआधी भाजपसोबत युती असताना हिंदुत्वाच्या मुद्यावर उद्धव ठाकरे कधी रस्त्यावर उतरले नाहीत. लालकृष्ण अडवाणी-मुरली मनोहर जोशींच्या रथयात्रांत तर उद्धव ठाकरे फिरकलेदेखील नाहीत. हात उंचावून जाहीर सभांमध्ये हिंदुत्वाच्या पोकळ गर्जना करणारे उद्धव ठाकरे बाबरी प्रकरणाच्या वेळी शिवसैनिकांना रस्त्यावर उतरवून घरात टीव्ही बघत होते, तर तीन वर्षांपूर्वीच्या देवेंद्र फडणवीस यांच्या महाजनादेश यात्रेत सहभागी झाले नव्हते.

'मुंह मे राम, बगल मे राहुल' ही म्हण उद्धव ठाकरे यांच्यासाठीच शब्दशः तयार झाली असावी असा टोला लगावून ते म्हणाले, यांना रामाची नाही, तर राहुलची आरती आवडू लागली आहे. राहुल गांधींच्या पदयात्रेस हजर राहून उद्धव ठाकरे आपल्या काँग्रेसनिष्ठेचा नजराणा सोनिया गांधींना देणार आहेत का, असा सवालही त्यांनी केला.

## राज्य सरकार उभारणार 'कवितांचे गाव'

### वेंगुर्ल्यातील उभा दांडा गावाची निवड

**मुंबई : प्रतिनिधी**

साहित्य क्षेत्रातल्या अनोख्या उपक्रमांसाठी महाराष्ट्र प्रसिद्ध आहे. पुस्तकांचे गावानंतर आता महाराष्ट्रात कवितांचे गाव हा नवा उपक्रम राबवण्यात येणार आहे.

या अंतर्गत तळकोकणातल्या वेंगुर्ला इथल्या उभा दांडा या गावात हे कवितांचे गाव उभे राहणार आहे. यामध्ये जगातल्या विविध भाषांमधल्या कविता ऐकायला वाचायला मिळणार आहेत. कविता प्रेमींना शिंदे सरकारकडून ही अनोखी भेट देण्यात येत आहे. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी या उपक्रमाची घोषणा केली आहे.

महाराष्ट्राला पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, अण्णाभाऊ साठे अशा वेगवेगळे साहित्यप्रकार हाताळणाऱ्या लेखकांची, मंगेश पाडगावकर, बा. भ. बोरकर, शांता शेळके अशा प्रतिभावंत कवींची परंपरा लाभली आहे. अशा या महाराष्ट्रात आता कवींसाठी आणखी एक अभिनव उपक्रम राबवण्यात येणार आहे. उचयापूर्वी सातारा जिल्ह्यातील भिलार हे गाव पुस्तकांचं गाव म्हणून घोषित करण्यात आले होते.

या गावामध्ये विविध विषयांवरची विविध पुस्तके घरांच्या आवारातच ठेवण्यात आली आहेत. इथे देशभरातून, जगभरातून पर्यटक भेट देत असतात. त्यामुळे या भागातल्या पर्यटनालाही चालना मिळाली आहे. आता कवितांचे गाव हा उपक्रम कशा पद्धतीने उपयोगी ठरतो, त्याचा कसा फायदा होतो, या उपक्रमाचे स्वरुप काय असेल, याबद्दल अधिक माहिती येणाऱ्या काळात समोर येईल.

## व्यवसाय सुलभता केंद्राचे आज उद्घाटन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडको भवनच्या तळ मजल्यावर स्थापित करण्यात आलेल्या व्यवसाय सुलभता केंद्राचे (Ease Of Doing Business) उद्घाटन गुरुवारी (दि. २०) दुपारी २ वाजता सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

याबाबतची माहिती सिडकोच्या जनसंपर्क अधिकारी प्रिया रातांबे यांनी दिली.

## खालापुरात कारखाना व्यवस्थापकाची २३ लाख ७५ हजारांची फसवणूक

**खोपोली : प्रतिनिधी**

माल पुरवठा करतो, असे सांगून दोन परप्रांतीय दलालांनी होनाड येथील झिग्मा इंटरनॅशनल कारखान्याची सुमारे २३ लाख ७५ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. याबाबत खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**परप्रांतीय दलालाविरोधात गुन्हा दाखल**

फिर्यादी उमेश लक्ष्मण वरघेडे (वय ३४, रा. ढेकु पो. साजगाव) हे झिग्मा इंटरनॅशनल कारखान्यात प्लांट मॅनेजर आहेत. आरोपी संदिप पासवान (वय ४७ रा. राणी दुर्गावती शोभापुर, मध्यप्रदेश) हा दगडी कोळशाची राख (सेनोस्पेअर) या मालाचा पुरवठादार असून बबलू संजय कनोजे (खापरखेडा, नागपूर) हा दलाल आहे. आरोपींनी आपसात संगनमत करून कारखान्यात माल पुरवठा करण्याबाबत लिखीत करारनामा केला.

संदीप पासवान यांच्या मालकीच्या एस. पी. कन्स्ट्रक्शन अॅन्ड सप्लाय या कंपनीच्या नावाने बनावट वर्क ऑर्डर, टेंडर ऑर्डर दाखवून झिग्मा कारखाना व्यवस्थापनाकडून २३ लाख ७५ हजार रक्कम आरोपींनी घेतली, परंतु कित्येक महिने उलटूनसुद्धा मालाचा पुरवठा केला नाही. अखेर कारखाना व्यवस्थापनाला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच, त्यांनी खोपोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे संदिप पासवान आणि बबलू कनोजेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक हरिश काळसेकर हे करीत आहेत.

## नारपोली गावातून एक जण बेपत्ता

**पनवेल :** नारपोली गावातील एकजण घरातून कोणास काही एक न सांगता निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आला आहे. शिवाजी भानूदास विटकर (वय ४०) असे या बेपत्ता व्यक्तीचे नाव असून त्याची उंची ५.७ इंच, रंग सावळा, अंगाने सडपातळ, अंगात लाल फुल शर्ट, साधी पॅन्ट, पायात चप्पल, डाव्या हाताला जखमेच्या टाक्याची खूण, उजव्या हातात चांदीचे ब्रेसलेट आहे. त्याला भाषा मराठी बोलता येते. या व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास तालुका पोलीस ठाणे (०२२-२७४५२४४४) किंवा पोलीस नाईक एस. बी. सरगर यांच्याशी संपर्क साधावा.

## भाजप बेस्ट कामगार संघ व प्रशासनात वेतन करार

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजप बेस्ट कामगार संघाने प्रलंबित बेस्ट कामगारांचा २०१६-२०२१ वेतन करारावर सह्या करून करार पूर्ण केला. त्यामुळे बेस्ट कामगारांमध्ये ऐन सणाच्या वेळी आनंदाचे वातावरण आहे.



भाजप बेस्ट कामगार संघाच्या शिष्टमंडळाने मंगळवारी (दि. १८) कुलाबा येथे बेस्टचे महाव्यवस्थापक लोकेश चंद्र यांची भेट घेतली. अध्यक्ष गणेश हाके सरचिटणीस व गजानन नागे यांनी प्रलंबित असलेला २०१६-२०२१चा करार पूर्ण करण्यात आला. करारावर युनियनतर्फे अध्यक्ष गणेश हाके व सरचिटणीस गजानन नागे, तर बेस्ट उपक्रमातर्फे महाव्यवस्थापक लोकेश चंद्र, व्यवस्थापक रवींद्र शेट्टी, विधी व्यवस्थापक डुबल यांनी सह्या केल्या. या करारानुसार कामगारांना ६,५०० ते ११,५०० रुपयांपर्यंत पगारवाढ व सातव्या वेतन आयोगाच्या तरतूदी लागू झाल्या. त्याचप्रमाणे बैठकीत बेस्ट कामगारांच्या इतर मागण्याबाबत चर्चा करण्यात आली. त्यामध्ये उर्वरित कामगारांना एलटीए कधीपर्यंत मिळणार, अभिलेखक कर्मचाऱ्यांवर १२ वर्षांपासून होत असलेला अन्याय, कामगारांचे हजेरी व रजा अॅप पुन्हा सुरू, चलो अॅपवर कर्मचाऱ्यांवर असलेले तिकीट बंधनकारक करू नये, फक्त काही ठराविक ठिकाणी पीक पॉईंटला फक्त ग्राउंड बुकिंग ठेवण्यात येईल, बसवाहक व चालकांना निरिक्षक पदावर बढती दिली, पण सेवावाढमधील तफावत दिली नव्हती. त्या त्रुटी महाव्यवस्थापकांना दाखवून त्या निरिक्षकांना न्याय देण्याबाबत चर्चा करण्यात आली.

बैठकीला भाजप बेस्ट कामगार संघाचे अध्यक्ष गणेश हाके, सरचिटणीस गजानन नागे, भाजप कामगार संघाचे वरिष्ठ पदाधिकारी आनंद जरग, राजकुमार घार्गे, अनिल यादव, विजय माळवे, बबन बारगजे, संतोष काटकर, परेश चिले, ऋषिकेश खेडेकर, श्रीकांत गलांडे, संजय वानखेडे आदी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांच्या दिवाळी वस्तू, चित्रांचे प्रदर्शन

**उरण : वार्ताहर**

द्रोणागिरी हायस्कूल इंग्रजी माध्यम विद्यालयात दिवाळीनिमित्त रांगोळी, चित्र तसेच दिवाळीसाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या शोभेच्या वस्तूंचे भव्य प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन बुधवारी (दि. १९) विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रभू आणि छोटा शिशू आणि मोठा शिशू या वर्गांच्या पी. टी. मेंबर्स यांनी केले.

तत्पूर्वी विद्यालयातील लहानग्यांनी विद्यालयाच्या आवारात दिवाळी साजरी केली. या प्रदर्शनातील सर्व रांगोळी आणि चित्रे तसेच इतर शोभेच्या वस्तू विद्यालयातील इ. सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी तयार केल्या होत्या. हे प्रदर्शन चांगले व्हावे यासाठी कलाशिक्षक कन्हैया कोळी यांनी विशेष मेहनत घेतली. या





प्रदर्शनात दिवे, आकाशकंदील आणि रांगोळी काढण्यासाठी छोटा शिशू आणि मोठा शिशू या वर्गाच्या पालकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

## पनवेल महापालिकेतर्फे आज गर्भसंस्कार शिबिर

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या वतीने 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त गणेश देशमुख यांच्या सुचनेनूसार गुरुवारी (दि. २०) दुपारी ३ वाजता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 'गर्भसंस्कार शिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे.

महापालिका क्षेत्रातील सर्व महिलांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रभारी मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. रेहाना मुजावर यांनी केले आहे.

या गर्भसंस्कार शिबिरास नील हॉस्पिटलच्या डॉ. शुभदा नील मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये गर्भवती महिलांसाठी संगीत थेरपी, नॉर्मल डिलिव्हरी, आहार, व्यायाम, योगासने याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हे शिबिर पूर्णत: मोफत असणार आहे, तरी महापालिका क्षेत्रातील महिलांनी मोठ्या प्रमाणात या शिबिरास उपस्थित रहावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## नरेंद्र पाटील यांनी स्वीकारला महामंडळाचा पदभार

**नवी मुंबई : बातमीदार**

शासनाच्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महांडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी मुंबई येथील कार्यालयात पदभार स्विकारला.



या वेळी आमदार प्रसाद लाड, निरंजन डावखरे, प्राना फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. प्राची पाटील, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे अध्यक्ष एकनाथ जाधव, संयुक्त सरचिटणीस रविकांत पाटील, दिलीप खोंड, जनसंपर्क अधिकारी पोपटराव देशमुख, कायदेशीर सल्लागार अॅड. भारती पाटील आदी उपस्थित होते.

पान १ वरून

### बालनाट्यविषयक सहविचार सभा उत्साहात

या सहविचार सभेला रंगनील नाट्य संस्थेच्या अध्यक्ष कल्पना कोठारी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नियामक मंडळाचे सदस्य श्यामनाथ पुंडे, सीकेटी विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांच्यासह विविध विद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते.

या वेळी बालनाट्यांचे प्रसिद्ध दिग्दर्शक राजू तुलालवार यांनी बालरंगभूमीची व्याख्या उपस्थितांना सांगितली तसेच बालरंगभूमीच्या सुरुवात कधी झाली, त्याचा इतिहास काय आहे याबाबतची माहिती दिली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेलचे शाखेचे उपाध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी चांगल्या प्रकारे व्यक्त होण्यासाठी आपल्याकडे चांगले विचार, भाषा आणि योग्य ठिकाणी असणे आवश्यक असल्याचे अधोरेखित केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेलचे शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि नाट्य परिषद या दोन्ही संस्था मागील १६ वर्षे अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा अतिशय भव्य दिव्य स्वरूपात आयोजित करीत आहेत. या स्पर्धेत अनेक होतकरू रंगकर्मींनी आपला ठसा उमटवून व्यावसायिक नाट्य क्षेत्रात यशस्वी पदार्पण केलेले आहे. पनवेल, उरण परिसर सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध परिसर असून हा कलाकारांचा प्रदेश आहे. विद्यार्थ्यांमधील अभिनय कलेला प्रोत्साहन मिळावे, त्यांना रंगमंच उपलब्ध व्हावा त्याचबरोबर एक सृजनशील पिढी तयार व्हावी म्हणून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.


**उरण नगरपरिषद, उरण**
**निविदा सूचना**

जा.क्र.उनप/बांवि/२६२९/२०२२-२०२३
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड.
दिनांक : १९/१०/२०२२

उरण नगरपरिषद खाली नमूद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदारांकडून मोहरबंद निविदा मागवित आहे. निविदा दिनांक ३१ -१०-२२ रोजी सायं.४.०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या नांवे दाखल करणेच्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रूपये) | इसारा रक्कम | सुरक्षा अनमात | | कामाची मुदत | निविदा फॉर्म फी रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २%रोखीने | ७% रोखीने | | |
| | उरण नगरपरिषदेच्या मोरा प्राथमिक शाळा क्र. ३ मोरा येथील शौचालयासाठी सेप्टीक टँकचे बांधकाम करणे. | रु.८९,६७६/- | रु.८९७/- | रु. १,७९४/- | रु.६,२७७/- | १५ दिवस | रु. १००/ |

सदर कामाच्या अटी/शर्ती बांधकाम विभागातून माहितीकरिता उपलब्ध असून इच्छूक ठेकेदारांनी बांधकाम विभाग प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

सही/-
(राहूल इंगळे)
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद, उरण

**पनवेल महानगरपालिका**
**ता, पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२
फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१
आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com
वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र/प.महा/पर्या./३९२२/प्र.क्र.४२/१५०/२०२२
दिनांक : १९/१०/२०२२

**जाहीर आवाहन**

उपरोक्त विषयान्वये कळविणेत येते की, पनवेल शहर हद्दीतील सर्व फटाके विक्री करणारे व्यावसायिक व फटाके वापर करणारे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार, अधिसूचना क्रमांक G.SR.६८२ (E) dt.५.१०.१९९९ अन्वये १२५ dB (I) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री वापर करण्यास मनाई केली आहे.

अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बेरियम सॉल्ट, लिथीयम, आसेनिक, लीड, मरक्युरी, यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकांमुळे विषारी वायु तयार होतात हे वायू प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत. तसेच जनहित याचिका क्र.१५२/२०१५ मध्ये मा.ना.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाका विक्रेत्यांनी विस्फोटक व अधिनियम १८८४ आणि त्या अंतर्गत केलेले विस्फोटक नियम २००८ मधील प्रतिबंध व नियम यांची अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करू नयेत. तसेच परवानगी असलेले फटाके पनवेल महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच विक्री करणेची आहे.

महाराष्ट्र शासनाने माझी वसुंधरा अभियान ३.० आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अभियानांतर्गत फटाके मुक्त, प्लॉस्टिकमुक्त व पर्यावरण पुरक सण - उत्सव साजरा करण्याचा प्रयत्न करून सदर अभियानांतर्गत नागरीकांनी फटाक्यांचा वापर टाळावा. प्लॉस्टिकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करा. सण समारंभामध्ये पुनर्वापर करण्यायोग्य वस्तुंचा वापर जास्तीत जास्त करावा. पर्यावरण पुरक प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करावी.

तरी येणारी दिवाळी हरित व पर्यावरण पुरक दिवाळी म्हणून साजरी करूया. तसेच ही दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो. अपणा सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा.

सही/-
(कैलास गावडे),
उपायुक्त (पर्यावरण)
पनवेल महानगरपालिका

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

**REDEVELOPMENT TENDER NOTICE**
**MAULI DARSHAN CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD.**
**HAS EXTENDED THE LAST DATE**
**FOR SUBMISSION OF TENDER TILL 05/11/2022.**
**REFERANCE TO ADVERTISMENT DATED 05/10/2022**
**Date of Issue Of tender document: 06/10/2022**
**EXTENDED Last Date of Submission:**
**FROM 20/10/22 TO 05/11 /2022 Up to 5.00 PM.**
**AREA OF PLOT- : 1102.60 SQ. MTS.**
**NO OF MEMBERS - : 32 (23 Flat & 9 Shop)**
**The Society is holding all the powers for Redevelopment.**

Tender documents are available at : Project Management Consultant's (PMC) office at:

**UNIQUE SOLUTIONS**
**Shop No. 01, Rajhans Chs Ltd, Opp. Saraswat Bank, S.N. Road**
**Panvel 410 206**
**Mobile No. 9920075676**
**Email - usolutions2@gmail.com**
(Timing 11.00 am to 5.00 pm)
(Sunday Closed)

**Cost of Tender Form: Rs. 5900/-**
**(Rs. 5000 + 18% GST)**
**(Non Refundable)**
by Cash / Pay order / D.D only Payable at Panvel, in the Name of
**UNIQUE SOLUTIONS**
**Date of Issue Of tender document: 06/10/2022**
**Last Date of Submission : 05/11/2022 Up to 5.00 PM.**

# फेरीवाल्यांना गावात येण्यास मनाई

## पनवेलमधील ग्रामपंचायत हद्दीत फलक / मुले पळविण्याच्या घटनांमुळे सावध पवित्रा

**पनवेल : वार्ताहर**

मुलांना पळवून घेऊन जाणाऱ्या घटना सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत. त्यामुळे सावध राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. त्यातच पनवेल तालुक्यात काही ग्रामपंचायतींनी बाहेरील फेरीवाल्यांनी गावात येण्यास मनाई केली आहे. अशा प्रकारचा बॅनर त्यांनी ग्रामपंचायत हद्दीत लावले असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे हे बॅनर ग्रामपंचायतीतर्फे लावण्यात आले आहेत.







मुलांना पळवून नेत असल्याच्या बातम्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. कोणतीही शहानिशा न करता अशा प्रकारचे व्हिडीओ फॉरवर्ड केले जात आहेत. त्या अनुषंगाने पनवेल तालुक्यात खबरदारी घेतली जात आहे. विचुंबे ग्रामपंचायतने गावात येणाऱ्या प्रत्येक फेरीवाले, भंगारवाले, ढोंगी बाबा, अनोळखी व्यक्ती यांना गावात येण्यास मनाई केल्याचा बॅनर लावला आहे. तर चिपळे, विचुंबे तसेच विहिघर गावच्या स्टॉपवर अशा प्रकारचा बॅनर लावलेला दिसून येत आहे. या वेळी पालकांनी आणि मुलांनी सावध राहून काळजी घेण्याचे आवाहन त्या बॅनरमधून करण्यात आले आहे. फेरीवाले म्हणजे हातावर पोट भरणारी माणसे, दिवसभर गावामध्ये किंवा आठवडी बाजारात फिरून ते आपल्या मालाची विक्री करतात, मात्र सध्या गावांमध्ये फेरीवाल्यांना बंदी करण्यात आल्याने त्यांच्यावर संक्रांत आली आहे. त्यांना उपासमारीचा सामना करावा लागत आहे. काही फेरीवाले प्रामाणिकपणे आपला व्यवसाय करतात. त्यामुळे या बंदीमुळे प्रामाणिक फेरीवाल्यांना हा त्रास सहन करावा लागत आहे.

अशा प्रकारच्या बॅनरबाजीबाबत एका पोलीस अधिकाऱ्याला विचारले असता पनवेल परिसरात अशा कोणत्याही प्रकारच्या घटना घडल्या नसल्याचे म्हटले आहे. असे असले तरी गावकऱ्यांनी सतर्क राहून खबरदारी घ्यावी, असेही सूचित केले आहे.

# बीपीसीएल कंपनीविरोधातील उपोषणाला भाजपचा पाठिंबा




**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील भेंडखळ येथील भारत पेट्रोलिअम कार्पोरेशन अर्थात बीपीसीएल कंपनी व्यवस्थापनाच्या विरोधात अविनाश रमण ठाकूर यांनी आमरण उपोषण पुकारले आहे, त्या उपोषणाला भाजप कामगार आघाडीचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी भेट देऊन पाठिंबा दिला आहे.

या वेळी संतोष मढवी, निलेश पाटील, विजय घरत, प्रेमकुमार घरत, सहदेव पाटील, उरण तालुका कामगार आघाडीचे अध्यक्ष चंद्रकांत कडू, भेंडखळचे माजी उपसरपंच मिलींद पाटील, विलास म्हात्रे, मेघश्याम ठाकूर, रमण ठाकूर, भारत ठाकूर, प्रियांका ठाकूर, सुवर्ण घरत, चेतन पाटील, गणेश ठाकूर, रतिष पाटील, पंकज भोईर, प्रवीण पाटील, दिलीप पाटील, राजू जाधव, नामदेव रसाल आदी सर्व कामगार पदाधिकारी उपस्थित होते.

अविनाश ठाकूर त्यांच्या प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदल्यासह अन्य मागण्यांसंदर्भात उपोषणाला बसले आहेत.







पनवेल : सिद्धांत मार्केट को-ऑप. हौसिंग सोसायटीचे चेअरमन रवींद्र गायकवाड यांनी शेकापमधून भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. सीकेटी महाविद्यालयात झालेल्या आरोग्य महाशिबिराच्या वेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा झाला. रवींद्र गायकवाड यांच्यासोबत विकास गायकवाड, एन. आर. पाटील, पी. एस. फुले, विनोद खंडारे, राजकुमार मेश्राम, संतोष कदम, विशाल गाडे, संगीता गायकवाड, सुष्मिता गायकवाड, संध्या गायकवाड हेही भाजपमध्ये दाखल झाले आहेत. या सर्वांचे पक्षात स्वागत करण्यात आले.

# गव्हाण विद्यालयातील विद्यार्थ्यांचा प्रदूषणमुक्त दिवाळीचा संकल्प

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी यंदाची दिवाळी प्रदूषण मुक्त आणि फटाके मुक्त अशी साजरी करण्याचा निश्चय करून तसा संकल्प केला.

विद्यालयाच्या गुरुकुल विभागाच्या इयत्ता आठवी ब या वर्गाच्या वतीने शिक्षकांसाठी भेटू वस्तू, मिठाई व भेटकार्ड तयार करण्यात येऊन त्याच्यावर योग्य फटाके मुक्त दिवाळीचा संकल्प करण्याचे संदेश देण्यात आले. विद्यार्थ्यांनी रांगोळी काढून 'फटाके मुक्त दिवाळी'असा संदेश त्यावर लिहिला. आठवी ब या वर्गाच्या वर्ग शिक्षिका द्रोपदी वर्तक यांनी विद्यार्थ्यांच्या वतीने सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

या वेळी विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले, 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, परीक्षा विभाग प्रमुग चित्रलेखा पाटील, उपशिक्षक प्रसन्न ठाकूर व सागर रंधवे आणि विद्यार्थी उपस्थित होते.



# हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे हलालमुक्त दिवाळी आंदोलन





**पनवेल : वार्ताहर,**
**नवी मुंबई : बातमीदार**

मॅकडोनल्ड्स, केएफसी, बर्गरकिंग, पिझ्झा हट यांसारख्या नामवंत कंपन्या हिंदू, जैन, शीख अशा गैर-मुस्लिम समाजाला सर्रास हलाल खाद्यपदार्थ विकत आहेत. भारतातील १५ टक्के मुसलमान समाजासाठी ८० टक्के हिंदू समाजावर हलाल उत्पादनांची सक्ती आम्ही खपवून घेणार नाही. या अघोषित हलाल सक्तीच्या विरोधात हिंदु जनजागृती समितीसह हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या वतीने पनवेल येथील ओरियन मॉलच्या जवळ हलालमुक्त दिवाळी हे आंदोलन करण्यात आले.

या वेळी आंदोलनकर्त्यांनी हातात प्रबोधनपर फलक धरले होते आणि घोषणाही देण्यात आल्या तसेच शासनाला देण्यात येणाऱ्या निवेदनावर लोकांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. असेच आंदोलन नवी मुंबईतही करण्यात आले. गेल्या काही काळापासून भारतात हेतूतः हलाल उत्पादनांची मागणी केली जात असून हिंदु व्यापाऱ्यांना व्यवसाय करण्यासाठी हलाल प्रमाणपत्र घ्यावे लागत आहे. पूर्वी हलाल ही संकल्पना केवळ मांसाहारी पदार्थांपुरती आणि मुस्लिम देशांच्या निर्यातीसाठी मर्यादित होती. आता मात्र भारतातील साखर, तेल, आटा, चॉकलेट, मिठाई, सौंदर्यप्रसाधने, औषधे अशी विविध उत्पादनेही हलाल सर्टिफाइड होऊ लागली आहेत.

मुळात भारत सरकारच्या अधिकृत आणि या संस्था उत्पादनांचे प्रमाणिकरण करत असताना वेगळ्या हलाल प्रमाणिकरणाची गरजच काय? हिंदूंना धर्मस्वातंत्र्य नाही का, ग्राहक म्हणून अधिकारी नाही का, भारताला धर्मनिरपेक्ष म्हणायचे आणि धर्माच्या आधारावर उत्पादनांच्या इस्लामी प्रमाणिकरणाचा घाट घालायचा, हा काय प्रकार आहे? असे प्रश्न या वेळी हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या प्रतिनिधीकडून उपस्थित करण्यात आले तसेच हलालमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन या वेळी करण्यात आले.

# 'अस्मि'तर्फे होणार फॅशन शो

**पनवेल : वार्ताहर**

अस्मि सोशल ग्रुपच्या माध्यमातून रेट्रो वॉल्क फॉर द वर्ल्ड रेकॉर्ड या फॅशन शोच्या आयोजन करण्यात आले आहे. हा फॅशन शो डिसेंबर महिन्यामध्ये कल्याण येथील मेट्रो मॉल येथे होणार असून अस्मि सोशल ग्रुप या वेळी वर्ल्ड रेकॉर्डसाठी प्रयत्न करणार आहे. डिसेंबर महिन्यात होणाऱ्या या फॅशन शोबद्दलची सर्व माहिती बुधवारी (दि. १९) पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या पत्रकार परिषदेला अस्मि सोशल ग्रुपच्या संस्थापिका रजनी भट,सहसंस्थापक दिपाली गोडसे-लिमये, सुप्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट बीजल गडा, पनवेल येथील अथर्व मीडिया वर्ल्डचे मिलिंद राणे, फॅशन कोरिओग्राफर यश शेलार, शशांक पाडळे आणि अस्मि सोशल ग्रुपची संपूर्ण टीम उपस्थित होती. अस्मि सोशल ग्रुपच्या माध्यमातून राबवण्यात येणारा हा फॅशन शो १८ ते साठ वर्षे वयोगटासाठी असणार आहे व एक हजाराहून जास्तीत जास्त मॉडेल याच्यामध्ये सहभागी होतील. त्याचप्रमाणे सजग एनजीओ मधीलदेखील काही महिला याच्यामध्ये सहभाग नोंदवणार आहेत. त्याचबरोबर एलजीबीटी कम्युनिटीला सुद्धा सहभागी होता येणार असल्याची माहिती अस्मि ग्रुपच्या संस्थापिका रजनी भट आणि दिपाली गोडसे-लिमये यांनी दिली.

या फॅशन शोसाठी स्पॉन्सर्ड म्हणून मेट्रो जंक्शन मॉल, एन आय एफ डी पनवेल, अथर्व मीडिया, सिम्प्रा,गव्यान इव्हेंट, बिजल गडा मेक ओव्हर, धर्मचक्र, लंडन प्राईम, रिकोड, मिरॅकल ब्युटी इव्हेंट्स आदींचे सहकार्य मिळणार आहे. सर्व लोकांनी आपल्या स्वतः ची इच्छा पूर्ण करण्यासाठी स्वतःचे हौस जपण्यासाठी तरी या प्लॅटफॉर्मचा वापर करावा. आम्ही अस्मि सोशल ग्रुपच्या माध्यमातून ही संधी सर्व लोकांना उपलब्ध करून देत असल्याचे बिजल गडा यांनी सांगितले.







## संपादकीय

# नाममात्र बदल?

**काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा निकाल बुधवारी जाहीर झाला. यामध्ये अपेक्षेप्रमाणे मल्लिकार्जुन खरगे हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. तब्बल २४ वर्षांनंतर काँग्रेसच्या अध्यक्षपदी गांधी घराण्याबाहेरील व्यक्तीची निवड झाली आहे. अर्थात त्यामुळे फारसे काही बदलणार नसून पक्षाची अवघी सूत्रे हायकमांडच्याच हाती राहतील हे सर्वज्ञात आहे.**

**काँग्रेस पक्षात लोकशाही असल्याचा दावा त्या पक्षाकडून कायमच केला जात असला तरी गेली तब्बल २४ वर्षे काँग्रेस पक्षाध्यक्ष पद हे गांधी परिवाराकडेच राहिले आहे. त्यातीलही निव्वळ दोन वर्षे २०१७ ते २०१९ हा काळ वगळता पक्षातील हे सर्वोच्च पद सोनिया गांधी यांच्याच हातात राहिले आहे. २०१४पासून काँग्रेस पक्षाची अवस्था दिवसेंदिवस अधिकाधिक केविलवाणी होत गेली आहे. त्यामुळेच आता पक्षाला नवसंजीवनी देण्यासाठी पक्षासंदर्भात काहीतरी वेगळे घडण्याची, किमान घडते आहे असे दाखवण्याची नितांत आवश्यकता होती. त्यातूनच अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा हा अवघा खेळ खेळला गेला असावा. या निवडणुकीत दुरंगी लढत झाली ती तरुण नेते शशी थरूर यांच्या निवडणूक लढवण्याबाबत ठाम राहण्यामुळे. अर्थात मल्लिकार्जुन खरगे हेच निवडून येणार हे सगळ्यांना आधीच ठाऊक होते. गांधी घराण्याचा कल खरगे यांच्या बाजूने होता तर शशी थरूर हे पक्षनेतृत्वाला प्रश्न विचारण्याचे धाडस दाखवणाऱ्या 'जी-२३' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या काँग्रेसमधील असंतुष्टांच्या गटामधले एक आहेत. बुजुर्ग आणि अनुभवी राजकारणी असलेल्या खरगे यांचे पारडे जड असल्याचा सूर राजकीय पंडितांनी सुरुवातीपासूनच लावला होता. त्यामुळे खरगे यांना ७,८९७ आणि थरूर यांना अवघी १,०७२ मते मिळाली तरी त्याविषयी फारसे कुणाला आश्चर्य वाटले नसेल. खरगे यांच्या निवडीमुळे काँग्रेस पक्षाचे आजवरचे पारंपरिक स्वरूपच कायम राहील असा टीकेचा सूर लागतो आहे. शशी थरूर हे तरुण, बुद्धिमान आणि संयुक्त राष्ट्रांतील प्रदीर्घ अनुभव असलेले नेते आहेत. त्यांची पक्षाध्यक्षपदी निवड झाली असती तर पक्षाला नवा चेहरामोहरा मिळण्यास मदत झाली असती असे मतही काही राजकीय पंडितांनी व्यक्त केले आहे, परंतु १३७ वर्षांचा इतिहास गाठिशी असलेल्या काँग्रेस पक्षाची अवस्था आता इतकी दीनवाणी आहे की खरगे अध्यक्षपदी असोत वा थरूर, तेवढ्याने परिस्थितीत फारसा काही फरक पडणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला टक्कर देण्याचे आव्हान पेलण्यासाठी काँग्रेस पक्षात फार मोठे मूलभूत बदल घडून यावे लागतील. अध्यक्षपदी खरगे आले असले तरी परिवारवादाच्या सावलीतून हा पक्ष बाहेर पडण्याची सुतराम शक्यता दिसत नाही. गेल्या आठ वर्षांत पक्षाची संघटना इतकी मोडकळीस आली आहे की तिला नवसंजीवनी देण्यासाठी पक्षसंघटनेत आणि एकंदर कार्यशैलीत आमूलाग्र बदल घडवावे लागतील. आता अध्यक्ष पदाच्या निवडणुकीमुळे तसेच राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो यात्रे'मुळे किमान काही तर घडत असल्याचे चित्र तरी निर्माण झाले आहे. इथून पुढे खरगे यांना पक्षाला नवसंजीवनी देण्याचे शिवधनुष्य पेलतानाच गांधी घराण्याची मर्जीही सांभाळावीच लागणार आहे. मोदींच्या आव्हानासमोर पक्षाला सक्षमपणे उभे करण्यासाठी निव्वळ विरोधाचे राजकारण सोडून पक्षाचा स्वत:चा असा काही विधायक कार्यक्रमही जनतेसमोर न्यावा लागणार आहे. नवे अध्यक्ष ही आव्हाने कशी पेलतात हे येणारा काळच दाखवून देईल.**

# कशेडी घाटात हवी कायमस्वरूपी उपाययोजना




पोलादपूरपासून केवळ नऊ किमी अंतरावर असलेल्या कशेडी घाटातील रस्ता हा मुसळधार पर्जन्यवृष्टीमुळे वारंवार खचत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या घाटातील डेंजरझोन असलेल्या ठिकाणी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

२००५मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथील एका कन्स्ट्रक्शन कंपनीद्वारे कशेडी घाटात पोलादपूरपासून नऊ किमी अंतरावर एका मोरीच्या बांधकामावेळी ब्लास्टींग करण्यात आल्याने या भागातील लाल माती कातळापासून सैल होऊन घाटरस्ता धोकादायक झाल्याचे वृत वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर केवळ दोनच महिन्यांनंतर धामणदिवीलगत मोठ्या प्रमाणात भूस्खलन होऊन लालमातीचा डोंगर राष्ट्रीय महामार्गावर उतरल्याने तब्बल १२ दिवस कशेडी घाट वाहतुकीस बंद राहिला.

त्यानंतर नव्याने निर्माण झालेला तुळशीखिंड रस्ता कशेडी घाटाला पर्यायी मार्ग असल्याचे जाहीर करण्यात आले. कशेडी घाटात जेथे मोरीजवळ महामार्ग तब्बल अडीच फूट खोल खचला आहे आणि रस्त्याला भेगा गेल्या आहेत, त्याठिकाणी छोट्या गाड्या अचानक खोलगट रस्ता आल्याने अडीच फूट उंचावरून झेपावताना दिसतात. केवळ खडी आणि लालमातीचे भराव करून हा खचणारा रस्ता पूर्ववत होणार नसल्याने सध्या भाग कशेडी घाटाचा 'डेंजरझोन' झाला आहे. कशेडी घाटातील लॅण्ड स्लायडिंगवर उपाययोजना करण्यासाठी दहा वर्षांपूर्वी २०१२मध्ये पावसाळ्यापूर्वी मेगाब्लॉक घेण्यात आला होता. त्यावेळी वाहतूक महाड तालुक्यातील राजेवाडीमार्गे विन्हेरे-तुळशीखिंड-नातूनगर-खेड तर अवजड वाहनांची वाहतूक महाड तालुक्यातील वीर टोळ-आंबेत-म्हाप्रळ-मंडणगडमार्गे खेड अशी वळविण्याचे आदेश दिले गेले. याठिकाणी मोरीचा स्लॅब फोडून महामार्गदेखील मधोमध चर खणून त्यामध्ये डबर टाकून भराव केला गेला. मोरीजवळील रस्ता सुमारे अडीच ते तीन फूट खचला असून हे अंतर साधारणत: ९० ते १२५ मीटर्सपेक्षा जास्त असल्याने या खचलेल्या रस्त्यावरही डबर टाकून लेव्हल करण्यात आली.

मुंबई-गोवा महामार्गावरील जीवघेणी वळणे आणि अरूंद मोऱ्यांजवळ होणाऱ्या सातत्यपूर्ण अपघातांबाबत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विशेष कार्यक्रम हाती घेण्यात आला असून चोळईतील हनुमान मंदिरापासून कशेडी बंगला येथील धोकादायक वळणावरील मोरी व साईड पिचिंगची मोरी अशी सर्व २९ ठिकाणी मोऱ्यांचे रूंदीकरण आणि मजबुतीकरणाचे बांधकाम करण्यात येत आहे. यासाठी सुमारे एक कोटी ८७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.


सार्वजनिक बांधकाम विभाग महाडचे प्रकाश गायकवाड यांच्याकडे यंदाच्या कामाबाबत माहिती मागितली असता यंदाचे काम तातडीच्या उपाययोजनेसंदर्भात असले तरी नजिकच्या काळात आयआयटी या नामांकित संस्थेमार्फत याठिकाणी कायमस्वरूपी उपाय करण्यासंदर्भात वनी येथील मंदिराच्या रस्त्याप्रमाणे मार्गदर्शन अथवा मदत घेण्यात येईल, अशी माहिती दिली आहे.

सध्या याठिकाणी डांबरीकरण करण्याचे काम ठेकेदाराने पूर्ण केले आहे. त्यामुळे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे होऊ घातलेले चौपदरीकरण आणि भरपावसाळयात येणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना कायमस्वरूपी दिलासा देण्यासंदर्भात या धोकादायक वळणावर सक्षमीकरणासह कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज दिसून येत आहे.

कशेडी घाटात २००५मध्ये मोठ्या प्रमाणात भूस्खलन होऊन सुमारे २४ दिवस वाहतूक बंद राहिली होती. त्यानंतर मेगाब्लॉक घेऊनही दोन वेळा वाहतूक बंद ठेवली गेली. २०१४च्या पावसाळ्यामध्ये पुन्हा रस्ता खचला आणि तहसीलदार काशिनाथ नाडेकर यांनी पाहणी करून संबंधितांना डागडुजीचे आदेश दिल्याने पावसाळ्यात गणेशोत्सव काळात तातडीची डागडुजी करण्यात आली. यानंतरही या डेंजरझोनचे खचणे सुरूच राहिल्याने आता पुन्हा येथे डबर, दगडभुकटीचा भराव करण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाने ठेकेदाराकडून करून घेण्यास सुरुवात केली आहे. दगडभुकटीचा वापर डबरीतील खाचा भरण्यासाठी केला जात असून वाऱ्याने ही भुकटी उडून वाहनचालकांच्या डोळ्यांत उडू नये यासाठी नदीतून दररोज पाच ते आठ टँकर्सद्वारे पाणी उपसा करून याठिकाणी फवारले जात आहे.

कशेडी घाटातील डेंजर झोन ठरलेल्या पोलादपूरपासून नऊ किमी अंतरावरील खचणाऱ्या ११० मीटर अंतराच्या मोठ्या मोरीसंदर्भात पत्रकारांनी याठिकाणी तत्कालीन सरकारचे कोट्यवधी रुपये खर्च होऊनही सातत्याने हे काम दर्जाहिन होत असल्याचे तत्कालीन पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या निदर्शनास आणले. या वेळी पत्रकारांनी दिलेल्या निवेदनातील चोळई बुरूडवाडी येथे कशेडी घाटातून भरधाव वेगाने येणाऱ्या अवजड वाहनांचे नियंत्रण ढळल्याने अनेकदा हनुमान मंदिरामागे अवजड वाहने कोसळून अपघात होत असल्याकडे लक्ष वेधण्यात आले. कशेडी घाटातील नव्याने रूंदीकरण करून बांधण्यात आलेल्या मोऱ्यांचे जमिनीलगत पायाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून हे काम पूर्णपणे काँक्रीटमध्ये करण्यात यावे, अशी मागणी तत्कालीन पालकमंत्री तटकरे यांच्याकडे करण्यात आली. काही मोऱ्यांच्या साईडपट्टीवर भराव न करताच डांबरीकरण करण्यात आल्याने तेथून जाणाऱ्या वाहनांमुळे डांबरीकरणाची दुर्दशा होत आहे, असेही पत्रकारांनी या वेळी सांगितले. गेल्या तीन वर्षांमध्ये चार वेळा 'डेंजर झोन' याठिकाणी काम होऊनही पुन्हा याठिकाणी महामार्ग खचलेल्या अवस्थेतच असल्याचे पत्रकारांनी सांगितल्याने तत्कालीन पालकमंत्री तटकरे यांनी पुन्हा मेगाब्लॉक घेऊन नव्याने कायमस्वरूपी आणि दर्जेदार बांधकाम करण्याचे आदेश दिले, मात्र कायमस्वरूपी उपाययोजना करण्याकडे दुर्लक्ष केले गेले.

कशेडी घाटात काँक्रीटचा भराव करून क्रॅश बॅरियर्स उभारल्यास दरीमध्ये झेपावणारी वाहने वाचून अपघातांची तीव्रता कमी होऊ शकेल, असे मत अभ्यासू नागरिकांमधून व्यक्त होत आहे. पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटातील डेंजरझोन ठरलेल्या पोलादपूरपासून नऊ किमी अंतरावरील खचणाऱ्या ११० मीटर अंतराच्या मोठ्या मोरीसंदर्भात राज्य आणि केंद्र सरकारने वेळीच लक्ष देऊन या ठिकाणी कायमस्वरूपी ठोस उपाययोजना न केल्यास महाडच्या ब्रिटीशकालीन सावित्री पुलासारखीच एखादी गंभीर मानवसंहारक दुर्घटना होऊन कोकणवासियांना याठिकाणी धरणीमातेच्या उदरात समाधीस्त होण्याची वेळ ओढवू शकेल. त्यामुळे दरवर्षी खचणाऱ्या या डेंजरझोनला केवळ ठेकेदारांसाठीचे कुरण म्हणून न पाहता कोकणवासियांचे संभाव्य मरण म्हणूनही गांभीर्याने विचारात घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.




## बॅकअप घेऊन क्लीन करा फुल झालेले स्टोरेज

गुगल फोटोज् हा फोटो आणि व्हिडिओ कायमचा जतन करण्याचा एक मार्ग आहे. या ॲपमध्ये फोटो आणि व्हिडिओ ठेवण्यासाठी वेगळ्या स्टोरेजची गरज नाही. त्याला क्लाउड स्टोरेज असेही म्हणतात.

सुरुवातीच्या काळात या ॲपमध्ये अमर्यादित फोटो आणि व्हिडिओ असू शकत होते. मात्र गुगलने गेल्या वर्षी जून महिन्यात त्यात बदल केला होता.गुगल ड्राईव्ह, जी मेल आणि गुगल फोटोज्मध्ये १५ जीबीपेक्षा जास्त डेटा वापरण्यासाठी वापरकर्त्यांना पैसे द्यावे लागतील.

**अशा प्रकारे गुगल फोटोज्वरून बॅकअप घ्या**

बॅकअप घेण्यासाठी, गुगल टेक आऊट टाइप करून गुगल क्रोम ब्राउझर शोधा. takeout.google.com वेबसाइटवर क्लिक करून साइन इन करा. क्रिएट अ न्यू एक्स्पोर्टवर क्लिक केल्यानंतर गुगल फोटोज्सोबत ४५ पर्याय दिसतील. यामधून गुगल ड्राईव्ह आणि गुगल फोटोज् निवडा. यानंतर पुढील सेटअपवर क्लिक करा. फाइल प्रकार आणि गंतव्य निवडा वर क्लिक करून बॅकअप तयार करा.

**या प्रमाणे बॅकअप डाउनलोड करा**

बॅकअप डाउनलोड करण्यासाठी, वितरण पद्धतीवर जा. ई-मेलद्वारे डाउनलोड लिंक पाठवावर ओके क्लिक करा. यानंतर फ्रिक्वेन्सीवर जा आणि एक्स्पोर्ट वनवर क्लिक करा. फाइल प्रकार आणि आकारावर क्लिक करा. तुम्हाला बॅकअप डाउनलोड करायचा आहे त्या जीबीची संख्या निवडा. १४ जीबी निवडल्यावर, २-२ जीबीच्या सात फाइल ई-मेलवर प्राप्त होतील. आता क्रिएट एक्स्पोर्टवर क्लिक करा. बॅकअप तयार आहे, तो जी मेलवरून डाउनलोड करा.

**स्टोरेज साफ करण्यासाठी या गोष्टी करा**

❋ गुगल फोटोज् स्वच्छ करण्यासाठी, प्रथम जी मेलसह गुगल फोटोज् ॲपवर लॉग इन करा.
❋ यानंतर तुम्हाला हटवायचे असलेले सर्व चित्र आणि व्हिडीओ निवडा.
❋ तुम्ही एकाच वेळी सर्व फोटो व व्हिडिओ हटवू शकता.
❋ एकाच वेळी सर्व हटवण्यासाठी सिलेक्ट ऑलवर क्लिक करा.
❋ आता ओकेवर क्लिक करून सर्व फोटो व व्हिडिओ हटवा.
❋ ट्रॅशवर गेल्यावर पुन्हा एकदा क्लीन ट्रॅशवर क्लिक करा.

# भारताचा धडाकेबाज फलंदाज विरेंद्र सेहवाग



विरेंद्र सेहवाग हा एक प्रसिद्ध भारतीय क्रिकेटपटू आहे. तो उजव्या हाताने फलंदाजी व गोलंदाजीसुद्धा करतो. विरेंद्र सेहवाग हा दिल्ली शहराचा रहिवासी आहे. आज त्याच्या वाढदिवशी त्याबद्दल काही खास गोष्टी जाणून घेऊया...

विरेंद्र सेहवागचा जन्म २० ऑक्टोबर १९७८ला झाला. त्याच्या वडिलांना वीरुने मोठे होऊन आपला हाच व्यावसाय पुढे चालवावा असे वाटत होते, पण क्रिकेटची आवड असलेल्या वीरुला हे काही मान्य नव्हते. त्याने त्याच्या आईच्या मदतीने क्रिकेट खेळणे सुरुच ठेवले. वडीलांनी किटबॅग पाहू नये म्हणून तो घराच्या गच्चीवर किटबॅग लपवून ठेवायचा, पण त्याच्या वडिलांना त्यांच्या मागे वीरुच्या या चाललेल्या करामतींची जाणीव होती. पण त्यांनी त्याला नंतर त्याबद्दल रोखलं नाही.

विरेंद्र सेहवागने आपल्या क्रिकेट कारकिर्दीची सुरुवात १९९७मध्ये दिल्ली क्रिकेट संघासह केली होती. १९९८मध्ये, दुलीप ट्रॉफीसाठी उत्तर जॉन क्रिकेट संघात त्याची निवड झाली. या करंडकाच्या सामन्यादरम्यान त्याने सर्वाधिक धावा करणाऱ्यांमध्ये आपले स्थान निर्माण केले. यानंतर त्याने रणजी करंडकातही जबरदस्त कामगिरी दाखवली आणि त्यानंतर त्याला १९ वर्षांखालील संघात समाविष्ट करण्यात आले. त्याला १९९९ मध्ये पाकिस्तानविरुद्ध पहिल्यांदा भारतीय संघाकडून खेळण्याची संधी मिळाली, पण केवळ एक धाव करून बाद झाला आणि त्यात भर म्हणजे त्याने गोलंदाजी करताना तीन षटकांत ३५ धावा दिल्या. त्यामुळे अखेर नंतर त्याला भारतीय संघातून वगळण्यात आले.

यानंतर वीरुला भारतीय संघात स्थान मिळवण्यासाठी तब्बल २० महिने वाट पहावी लागली. या काळात त्याने देशांतर्गत क्रिकेटवर लक्ष केंद्रित केले. त्याने १९९९-२००० च्या मोसमात दुलिप ट्रॉफीमध्ये ६५.६० च्या सरासरीने ३२८ धावा केल्या. यामध्ये त्याच्या २७४ धावांच्या खेळीचाही समावेश आहे. त्यावेळी ही त्या स्पर्धेतील सर्वोत्तम खेळी होती. त्यानंतर त्याने पंजाबविरुद्धच्या रणजी सामन्यात १७५ चेंडूत १८७ धावांची तुफानी खेळी करताना सर्वांचे लक्ष वेधले. या मधल्या काळात तो १९९८मध्ये १९ वर्षांखीलील विश्वचषकात भारतीय संघाकडूनही खेळला.

सेहवागने एएन शर्मा यांच्याकडून सुरुवातीला क्रिकेटचे धडे गिरवले होते. त्यांनी सेहवागमधील आक्रमक फलंदाजीची गुणवत्ता हेरली होती. त्यामुळे त्यांना त्याच्यातील आक्रमकपणा न बदलता त्यातच त्याला तयार केले. क्रिकेटचे प्रशिक्षण घेत असतानाचीच एक गोष्ट म्हणजे आशिष नेहरा आणि वीरु जुने मित्र ते दोघेही एकत्र सरावाला जायचे. त्यावेळी वीरु नेहराच्या घरी यायचा आणि मग नेहराच्या स्कूटीवर ते दोघे एकत्र मैदानात जायचे.

देशांतर्गत क्रिकेट गाजवत असताना सेहवागची डिसेंबर २०००मध्ये झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेसाठी भारतीय संघात निवड झाली. त्याच्या निवडीमागील एक किस्सा असा की, निवड समितीत उत्तर विभागातील मदन लाल निवड समीतीच्या बैठकीत नेहमी सेहवागचे नाव पुढे करायचे पण अन्य सदस्य त्याकडे दुर्लक्ष करायचे. पण एकदा त्यांनी जयवंत लेलेंना विश्वासात घेऊन निवड समिती अध्यक्ष असलेल्या चंदू बोर्डेंना मनवण्यास सांगितले. अखेर लेलेंनी बोर्डेंचे मन वळवले आणि सेहवागची भारतीय संघात निवड झाली.

सेहवागनेही त्यानंतर मागे वळुन पाहिले नाही. तो २००१च्या मध्यापर्यंत भारताच्या वनडे संघाचा नियमीत सदस्य झाला होता. याच दरम्यान नोव्हेंबर २००१मध्ये त्याला कसोटीतही पदार्पणाची संधी मिळाली. सुरुवातीला केवळ मर्यादीत षटकांचा खेळाडू म्हणून समजल्या जाणाऱ्या सेहवागचे कसोटी पदार्पण दणक्यात झाले. इतर कार्यचालू घडामोडी, क्रिकेट सामने आणि अनेक सामाजिक विषयांवर तो बिनधास्त भाष्य करतो. समाजकार्यातही तो आघाडीवर असतो पुलवामा हल्ल्यात शहिद झालेल्या जवानांच्या मुलांना तो त्याच्या विरेंद्र सेहवाग अकादमीत प्रशिक्षक देतोय आणि त्यांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्चही त्यानेच उचलला आहे.

**-साभार मराठी मोल**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : शहरातील विश्रामबाग उद्यानाची दूरवस्था झाल्याने नगर परिषदेच्या माध्यमातून नुकतेच या उद्यानाचे नूतनीकरण करण्यात आले. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांनी समाधान व्यक्त केले.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# 'या' पदार्थांच्या मदतीने सुधारा लहान मुलांची दृष्टी

आजकाल प्रत्येक लहान मुलाचा मोबाइलचा वापर वाढला आहे. अनेक लहान मुले तर मोबाइल नसेल तर जेवतसुद्धा नाहीत, त्यामुळे त्यांचा हट्ट नाईलाजाने पालकांना पूर्ण करावा लागतो, पण या वाढलेल्या स्क्रिन टाइममुळे लहान मुलांच्या दृष्टीवर वाईट परिणाम होऊन त्यांची दृष्टी कमजोर होते असल्याचे दिसत आहे. अगदी लहान वयातदेखील मुलांना चष्मा वापरावा लागत आहे. मुलांच्या वाढत्या स्क्रिन टाइममुळे अनेक पालक चिंतेत असतात. यावर उपाय करण्यासाठी मुलांच्या आहारात काही पदार्थांचा समावेश करू शकता, कोणते आहेत ते पदार्थ जाणून घ्या.



कठीण कवचाची फळे : कठीण कवचाची फळे जसे काजू, बदाम, शेंगदाणे 'विटॅमिन ई'चे उत्तम स्रोत मानले जातात, त्यामुळे लहान मुलांनी याचे सेवन केल्यास त्यांची दृष्टी सुधारण्यासाठी नक्की मदत मिळू शकते. यासह कठीण कवचाची फळे मायोपियावरील घरगुती उपचारासाठी उत्तम पर्याय मानले जाते. मायोपिया म्हणजे दूरची दृष्टी अस्पष्ट होण्याची अवस्था. काजू, बदाम, शेंगदाणे यांमध्ये ओमेगा३ फॅटी ॲसिड आढळते. ओमेगा ३ फॅटी ॲसिडमुळे डोळ्यांचा कोरडेपणा आणि डोळ्यांचे विकार कमी होण्यास मदत होते.

हिरव्या पालेभाज्या : हिरव्या पालेभाज्यांमध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शियम, विटॅमिन ए, सी आणि बी १२ आढळते, जे दृष्टीसाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते, तसेच यामुळे मुलांमध्ये वाढत्या वयानुसार होणाऱ्या मोतीबिंदू आणि मॅक्युलर डिजनरेशन हे आजार रोखण्यास मदत करते. त्यामुळे मुलांच्या आहरात हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करावा.

मासे : माशांमध्येदेखील ओमेगा ३ फॅटी ॲसिड आढळते, जे लहान मुलांच्या रेटीनासाठी अत्यंत उपयुक्त मानले जाते, तसेच हे डोळ्यांचे स्नायू मजबूत करण्यास आणि मेंदूच्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर ठरते.

गाजर : लहान मुलांची दृष्टी सुधारण्यासाठी गाजर फायदेशीर ठरते. यामध्ये बीटा कॅरोटीन आढळते, जे डोळ्यांच्या रेटीनासाठी फायदेशीर ठरते तसेच त्यामुळे सुर्यप्रकाशापासून संरक्षण मिळते.

स्ट्रॉबेरी आणि आंबट फळे : स्ट्रॉबेरी आणि संत्री, मोसंबी अशा आंबट फळांमध्ये 'विटॅमिन सी' भरपूर प्रमाणात आढळते. 'विटॅमिन सी' रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास सोबतच डोळ्यांना इन्फेक्शनपासून वाचवण्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते.

# नाट्यगृहाची तातडीने दुरुस्ती करा

## शिवसेना शिंदे गटाची खोपोली पालिका मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील छत्रपती शाहू महाराज नाट्यगृहाची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी खोपोलीतील बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) च्या पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी अनुप दुरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे

आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून शासनाच्या वतीने वेगवेगळ्या विविध विकास कामाच्या पूर्ततेसाठी खोपोली नगरपालिकेला वीस कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ती सर्व विकासकामे तातडीने मार्गी लावावी, अशा स्वरूपाची आग्रही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या विकासकामांमध्ये शहरातील रखडलेली भुयारी गटारी योजना डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयाची नवीन इमारत, तसेच छत्रपती शाहू महाराज नाट्यगृह दुरुस्ती करणे व इतर अनेक कामांचा समावेश आहे.




(छाया : विनायक माडपे)

बाळासाहेबांची शिवसेनेच्या शिष्टमंडळाने नगर परिषदेचे मुख्याधिकारी अनुप दुरे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. या निवेदनात खोपोलीतील छत्रपती शाहू महाराज नाट्यगृहाची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या शिष्टमंडळात शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख संदीप पाटील, शहर संघटक तात्या रिठे ,माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड, माजी शहरप्रमुख राजन सुर्वे यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांचा समावेश होता. मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी निवेदन स्वीकारले. व विकासकामे मार्गी लावली जातील असे सांगितले.

# माणगावात एसटी बस वाहकाला धक्काबुक्की; प्रवाशावर गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

एसटी बसमध्ये प्रवास करीत असताना तिकिटाचे १० रुपये मागितल्याचा राग येऊन प्रवाशाने वाहकाला धक्काबुक्की केल्याची घटना मंगळवारी (दि. १८) दुपारी घडली. या प्रकरणी वाहकाने दिलेल्या तक्रारीवरून संबंधीत प्रवाशावर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




श्रीवर्धन एसटी आगाराची बस (एमएच–२०,बीएल–१५७१) मंगळवारी दुपारी माणगावला येत होती. बसचे वाहक अविनाश साधू पवार (वय ३२) यांनी प्रवासी अहमद अब्दुल रेहमान जालगावकर (वय ५०, रा. निजामपूर, ता. माणगाव) यांच्याकडे तिकिटाचे १० रुपये मागितले असता त्यांनी पैसे देण्यास टाळाटाळ केली. परंतु प्रवासाचा शेवटचा टप्पा असल्याने त्यांना लगेच पैसे देण्यासाठी वाहकाने विनंती केली. मात्र जालगावकर याने वाहक पवार यांच्यासोबत अरेरावीची भाषा करण्यास सुरुवात केली. त्यावेळी अन्य प्रवाशांनी जालगावकर यास समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांचे न ऐकता जालगावकर हा वाहकाच्या अंगावर धावून गेला आणि धक्काबुक्की करून वाहकाच्या अंगावरील गणवेश फाडला.

या प्रकरणी वाहक अविनाश पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रवासी अहमद अब्दुल रेहमान जालगावकर याच्यावर माणगाव पोलीस ठाण्यात भादवि संहिता कलम ३५३,३२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास महिला उपनिरीक्षक अस्मिता पाटील करीत आहेत.

# जनकल्याण समितीतर्फे कर्जतच्या स्वच्छतादूतांचा सन्मान



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

रा. स्व. संघ जनकल्याण समितीच्या वतीने कर्जत नगर परिषदेच्या स्वच्छतादूतांचा भेटवस्तू आणि दिवाळी फराळ देऊन सन्मान करण्यात आला.

भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन झाल्यानंतर जनकल्याण समितीचे जिल्हा कार्यवाह नितीन भावे यांनी प्रास्ताविकात समितीच्या जिल्ह्यातील कामांची माहिती दिली. स्वच्छता अभियानामध्ये राष्ट्रीय पातळीवर मिळालेल्या पुरस्काराबद्दल नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल तसेच अन्य पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. जनकल्याण समितीचे कार्यवाह अविनाश धाट यांनी समितीच्या वतीने राज्यामध्ये चालणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, बांधकाम सभापती राहुल डाळिंबकर, आरोग्य अधिकारी सुदाम म्हसे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर उपस्थित स्वच्छता दूतांचा जनकल्याण समितीच्या वतीने भेटवस्तू व दिवाळी फराळ देऊन सन्मान केला.

सूत्रसंचालन रवींद्र लाड यांनी केले. जनकल्याण समितीचे निधी प्रमुख संजीव दातार, विभाग कार्यवाह रविकिरण काळे, भाऊ पोंडेकर, संघाचे तालुका कार्यवाह संतोष देशमुख, विहिंपचे विशाल जोशी, साईनाथ श्रीखंडे, श्रीकांत ओक, भगवान भगत, वनवासी कल्याण आश्रमाचे योगेश चोळकर, महेश निघोजकर, मिलिंद खंडागळे यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका आणि समितीचे कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

# दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठा गजबजल्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

दोन वर्षे दिवाळीवर करोनाचे सावट होते. त्यामुळे बाजारपेठेत फारसा उत्साह नव्हता. यंदा मात्र बाजारपेठांवरील मंदीचे मळभ दूर झाले आहे. दिवाळीचा सण दोन दिवसांवर आलाय. त्यामुळे बाजारात खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी होत आहे. रायगड जिल्ह्यातील बाजारपेठा गजबजू लागल्या आहेत.

ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी दुकाने सजली आहेत. दिवाळीनिमित्त खास सवलत, मोफत भेटवस्तू तसेच फायनान्स ऑफर्स देवू केल्या आहेत. ग्राहक या ऑफर्सचा पुरेपूर लाभ घेत आहेत. रेडीमेड कपडे, दागिने, दुचाकी, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, मोबाइल, लॅपटॉप, एलईडी, घरखरेदी, गृहोपयोगी वस्तू यांची खरेदी मोठ्या प्रमाणावर होत आहे. शिवाय पूजेसाठी लागणारी फुले, आकाशकंदील, फटाके, रांगोळी, मिठाई, फराळ आदी खरेदीची बाजारपेठेत लगबग दिसत आहे.



कपडा मार्केट चांगलेच तेजीत आले आहेत. नवनव्या फॅशनच्या कपड्यांनी दुकाने सजली आहेत. तयार कपड्यांवर विशेष ऑफर्स दिल्या आहेत. दिवाळीच्या मुहूर्तावर टीव्ही, फ्रीज, वातानुकूलित यंत्र, ओव्हन, सीडी, एलसीडी, संगणक यासारख्या वस्तू खरेदीला प्राधान्य दिले जात आहे. वाहनांची आगाऊ नोंदणी मोठ्या संख्येने होत आहे. मोबाइलसह इलेक्ट्रॉनिक उत्पादनांसाठी झिरो डाऊन पेमेंट, ईएमआय, शून्य टक्के व्याजासह कर्ज आदी सुविधाही देण्यात आल्या आहेत.

मिठाई, ड्रायफ्रुट तसेच तयार फराळ खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी होत आहे. रस्त्यांवर लावलेल्या स्टॉलवर आकाशकंदील, रांगोळी, फुले, पणत्या, फटाके आदी दिवाळीनिमित्त लागणाऱ्या वस्तूंची खरेदीसाठी रात्री उशीरापर्यंत ग्राहकांची वर्दळ होती. यावेळी दरवर्षीच्या तुलनेत अधिक स्टॉल्स रस्त्यावर पहायला मिळत आहेत.

गेल्या काही वर्षात ऑनलाईन खरेदीकडे ग्राहकांचा कल वाढला आहे. अ‍ॅमेझॉन, फ्लिपकार्ड, मिशो, आजीओ, मिंन्त्रा यासारख्या कंपन्यांनी दिवाळी सवलत योजनांचा भडीमार सुरु केला आहे. त्यामुळे ग्राहकांनी ऑनलाइन खरेदीवरही भर दिला आहे.

# रोहा तालुका युवा मोर्चा अध्यक्षपदी महेश ठाकूर

**धाटाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या शिफारशीनुसार व आमदार रविशेठ पाटील यांच्या सूचनेनुसार महेश ठाकूर (रा. पाले) यांची रोहा तालुका युवा मोर्चा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. रोहा विश्रामगृहात मंगळवारी (दि. १८) युवा मोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अमित घाग यांनी महेश ठाकूर यांना नियुक्तीपत्र प्रदान केले.

भाजपचे दक्षिण रायगड उपाध्यक्ष राजेश मापारा, रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांभेकर, युवा मोर्चाचे राजेश डाके, जयदीप तांबुटकर, नरेश कोकरे, वैभव कुलकर्णी, अविनाश कान्हेकर, कृष्णा बामणे, यज्ञेश भांड, सनल कुमार, आंनद लाड, शिवाजी पाटील, भाऊ शेलार, संजय लोटणकर सरचिटणीस, श्रेया कुंठे याच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

युवा मोर्चाच्या रोहा तालुका अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल महेश ठाकूर यांचे माजी आमदार अवधूत तटकरे, युवा नेते वैकुंठ पाटील यांनी अभिनंदन केले.



# म्हसळा आरोग्य अधिकारीपदी डॉ. सागर काटे यांची नियुक्ती

**प्रतिनिधी : म्हसळा**

गेले दोन तीन वर्षे रिक्त असलेले म्हसळा तालुका आरोग्य अधिकारीपदी डॉ. सागर काटे यांची नेमणूक करण्यात आली आहे.



डॉ सागर काटे यांनी यापुर्वी नेरळ, कोकबन आणि म्हसळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांत वैद्यकीय अधिकारी म्हणून काम केले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल साई आधार सोशल हेल्प फाउंडेशन–नाशिक या संस्थेने डॉ. काटे यांना नुकताच महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२२ ने सन्मानित केल आहे. १८ आक्टोबरपासून त्यांच्याकडे म्हसळा तालुका आरोग्य अधिकारीपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

# महाड येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील समान संधी केंद्राचे उद्घाटन




**अलिबाग : जिमाका**

समान संधी केंद्राच्या माध्यमातून विविध शिष्यवृत्त्या, स्वाधार, स्टॅण्ड अप इंडिया आदी योजना तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी, करिअर मार्गदर्शन इत्यादींबाबत विद्यार्थ्यांना माहिती मिळावी, असे प्रतिपादन समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी मंगळवारी (दि. १८) महाड येथे केले.

महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील समान संधी केंद्राचे उद्घाटन मंगळवारी समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थे (बार्टी) चे महासंचालक धम्मज्योती गजभिये, समाजकल्याण विभागाच्या कोकण विभाग उपायुक्त वंदना कोचुरे, सहाय्यक आयुक्त सुनील जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. शेजुळ, उपप्राचार्य श्री. सोनार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतिगृहाच गृहपाल श्री. मोरे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस आमचे अशिल श्रीमती तन्वी सुभाषचंद्र कर्नाड उर्फ तन्वी प्रियेश राव, रा. फ्लॅट नं.२०६, विंग–बी/१, सिध्दांत मार्केट, रुपाली सिनेमाजवळ, फायनल प्लॉट नं. २२४, पनवेल–४१० २०६ कळवितात की,

आमचे अशिलांचे वडिलांचे नावे खालील वर्णन केलेली मिळकत(फ्लॅट) आहे. सदरची मिळकत ही आमचे अशिलांचे वडिलांनी कायदेशीररित्या करारनामा दस्त क. ११४६/१९८९ दि. ०४/०७/१९८९ ने विकत घेतलेली असून सदरची मिळकत ही आमचे अशिलांकडे वारसा हक्काने आलेली असून ती त्यांचे ताबेकब्जात आहे.

**मिळकतीचे वर्णन**

फ्लॅट नं. बी–२०६, दुसरा मजला,
सिध्दांत मार्केट, फायनल प्लॉट नं. २२४ रुपाली टॉकीज जवळ,
पनवेल, ता. पनवेल, जि.रायगड
क्षेत्र ५६५.०५९ चौ. फुट (बिल्टअप)

सदरहू मिळकतीचे खालील वर्णन केलेली कागदपत्रे ही आमचे अशिलांना वडिलांकडे आढळून आलेली नाहीत, सबब ती गहाळ झालेली आहेत, सदर कागदपत्रांचे वर्णन,

१. मे.गणेश कन्स्ट्रक्शन आणि श्री. सुभाषचंद्र गंगया कर्नाड यांच्यातील करारनामा दस्त क्र. ११४६/१९८९ दिनांक ०४/०७/१९८९ रोजीचा मुळ प्रत.

२. मे.गणेश कन्स्ट्रक्शन आणि श्री सुभाषचंद्र गंगया कर्नाड यांच्यातील रजिस्टर दस्त क. ११४६/१९८९ दिनांक ०४/०७/१९८९ ची पावती मुळ प्रत.

सदर कागदत्रांची सर्टीफाईड प्रत आमचे अशिलांकडे आहे. सदरचे आमचे अशिलांचे गहाळ झालेले मुळ कागदपत्र कोणास सापडले असल्यास अगर त्याबाबत कोणतीही माहिती असल्यास खालील पत्यावर कळविण्यात यावे.

तसेच सदर मिळकतीचे मालकी किंवा अन्य हक्क हितसंबंधाबाबत काही सांगावयाचे असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द होताच १० दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे वा समक्ष येवून भेटावे. वरील उल्लेखित मुदतीमध्ये कोणाकडूनही लेखी तकार अथवा हरकती आल्या नाही तर सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही हक्क, हितसंबध नाही असे गृहीत धरुन आमचे अशिल त्यांचे मर्जीप्रमाणे व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. सदरहू मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
तारीख: १९/१०/२०२२

**सही/–**
**ॲड. सरिता रामधरणे–शहासने**

पत्ता : रुम नं.१, तळ मजला, कनक सॉलिटेअर, मिडल क्लास सोसायटी, प्लॉट नं.८०, पनवेल ता.पनवेल, जि.रायगड


# कर्जतमध्ये पौष्टिक अन्नपदार्थांचे प्रदर्शन



**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील कर्जत महिला मंडळ संस्थेच्या विद्या विकास शाळेत विद्यार्थ्यांसाठी पोषण माह सप्ताह आयोजित करण्यात आला होता. या सप्ताहाचा समारोप पौष्टिक अन्नपदार्थ प्रदर्शनाने झाला. या वेळी विद्यार्थ्यांनी कडधान्ये तसेच कंदमुळे आणि हिरव्या पालेभाज्या यांच्यापासून तयार केलेल्या अन्नपदार्थांचे प्रदर्शन मांडले होते.

विद्या विकास शाळेत विद्यार्थ्यांसाठी पौष्टिक माह सप्ताह आयोजित केला होता. या सप्ताहात विद्यार्थ्यांनी पौष्टिक अन्नाचे महत्त्व आणि गरज या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या सप्ताहानिमित्ताने विद्यार्थ्यांना दररोज पौष्टिक पदार्थ घरातून बनवून आपल्या सोबत डब्ब्यांमध्ये आणण्याची शाळेकडून करण्यात आलेली सूचना पालकांनी तंतोतंत पाळली.

विद्यार्थ्यांनी प्रदर्शनात मांडलेल्या पदार्थात शिजवलेले कडधान्य, आंबवलेले पदार्थ, हिरव्या पालेभाज्या, कंदमुळे, वेगवेगळ्या प्रकारचे सलाड, पौष्टीक लाडू, पुलाव आणि गोड पदार्थ मांडण्यात आले होते. कर्जत महिला मंडळ संस्थेच्या सचिव आणि विद्या विकास शाळेच्या कार्याध्यक्ष मीना प्रभावळकर, शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहा गाढे, पर्यवेक्षिका श्रद्धा मुंडेकर यांनी परीक्षण केले.

पौष्टिक अन्नपदार्थ प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी शिक्षिका स्मिता गणवे, प्रेमा पितळे, मेघा पिंगळे, सुषमा सुपे, माधुरी देशमुख, वृषाली माळी, सुप्रिया भासे, शारदा राठोड, प्रियांका पालवे यांचा सहभाग होता. पालक तसेच विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट घेवून पौष्टीक अन्नाबद्दल माहिती जाणून घेतली.

# मोरे महिला महाविद्यालयातर्फे आदिवासी वाडीत दिवाळीनिमित्त भेटवस्तूंचे वाटप

**रोहे : प्रतिनिधी**

एम. बी. मोरे फाउंडेशनच्या धाटाव येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागातर्फे रोहा तालुक्यातील मढाळी (पो. पुगाव) आदिवासीवाडीमधील मुलांना दीपावली निमित्त शैक्षणिक भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले.

वरसे येथील स्नेहवर्धीनी सामाजिक संस्थेच्या सहकार्याने मढाली आदिवासी वाडीत आयोजित केलेल्या कार्यक्रमात एनएसएसच्या विद्यार्थीनी आणि प्राध्यापकांच्या हस्ते शाळेत उपस्थित ५०विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे किट देण्यात आले. शाळेचे मुख्याध्यपक श्री. कदम, केंद्रप्रमुख कनोजे, शिक्षिका राजश्री तळकर, निकिता तळकर, सुरेखा दमणसईकर,स्नेहवर्धीनी संस्थेचे उमेश वाघमारे, महिला महाविद्यालयाच्या प्रा. ममता बिंद, प्रा. प्रतिमा भोईर, प्रा. माधुरी जाधव, प्रा. निकिता महाडिक यांच्यासह एनएसएस विभागाच्या २१ विद्यार्थिनी, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.





(छाया : महादेव सरसंबे)

# विरार-अलिबाग कॉरिडॉरच्या कामास वेग

## नवघर ते चिरनेर मार्गासाठी रस्ते विकास मंडळ सक्रिय

**उरण : वार्ताहर**

मुंबई महानगर प्रदेशातील पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्याच्या विकासात मैलाचा दगड ठरणाऱ्या बहुचर्चित विरार अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉरच्या पहिल्या टप्प्यातील नवघर ते चिरनेर या ८० किमीच्या मार्गासाठी वने आणि पर्यावरण मंत्रालयाची परवानगी अखेर रस्ते विकास मंडळाने मागितली आहे. ती मिळाल्यास, या मार्गाच्या बांधणीतील मोठा अडसर दूर होणार असल्याचे सुत्रांनी सांगितले.



हा मार्ग नवघरपासून सुरू होणार आहे. यात चिरनेर पर्यंतच्या या मल्टी मॉडेल कॉरिडॉरसाठी पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील खारफुटीस वनजमीन लागणार आहे. एमएसआरडीसीच्या प्राथमिक मुल्यांकनानुसार प्रकल्पात सुमारे ५,१३५ झाडे प्रभावित होणार आहेत. पर्यावरण वन आणि हवामान बदल मंत्रालयात सादर केलेल्या प्रस्तावानुसार पालघरमधून, एकूण ३३.२७८ हेक्टर वनक्षेत्र, ठाण्यातून ९९.८८ हेक्टर आणि रायगड मधून ७२.६५४ हेक्टर वनक्षेत्र या प्रकल्पात बाधित होणार आहे. हा कॉरिडॉर मुंबई अहमदाबाद मार्गाला ही जोडण्यात येणार आहे. दरम्यान, तुंगारेश्वरसह कर्नाळा, फणसाड ही अभयारण्यांना त्याचा फटका बसणार आहे. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाला सादर केलेल्या प्रस्तावानुसार, पालघरमधून एकूण ३३.२७८ हेक्टर वनक्षेत्र, ठाण्यातून ९९.८८ हेक्टर आणि रायगडमधून ७२६५४ हेक्टर वनक्षेत्र या प्रकल्पात बाधित होणार आहे.

विरार-अलिबाग मल्टिमॉडेल कॉरिडॉर एमएमआरडीएकडून एमएसआरडीसीकडे सोपविल्याने महामंडळास तो समृद्धी महामार्गासह प्रस्तावित कोकण एक्स्प्रेस वे सह जेएनपीटीला जोडता येणे सोपे झाले आहे. सध्या समृद्धी महामार्गाची जेएनपीटीला जोडणी नसल्याने एमएसआरडीसीला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या मुंबई-वडोदरा महामार्गावर अवलंबून राहावे लागत आहे. या मार्गाची भूसंपादन प्रक्रिया वेगात असून त्याचा समृद्धीच्या विकासावर परिणाम होणार आहे. विरार-अलिबाग मल्टिमॉडेल कॉरिडॉर हा दोन टप्प्यांत विकसित करण्यात येत आहे. यात पहिला टप्पा हा विरारनजीकच्या नवघर ते उरणनजीकच्या बलावली आणि दुसऱ्या टप्प्यात बलावली ते अलिबाग असा विकसित करण्यात येणार असून तो समृद्धी आणि कोकण एक्स्प्रेस वे ला जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरणार आहे.

याशिवाय मुंबई-अहमदाबाद, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे, जेएनपीटी ते मुंबई-गोवा-पुणे ययांना जोडणारा एनच-४ बी या महामार्गांना तो जोडण्यात येणार आहे.

### चिरनेर हा कॉरिडोरचा शेवटचा बिंदू

*८० किमी लांबीच्या कॉरिडॉरचा प्रारंभ बिंदू वसईतील बापाणे गावात असून शेवटचा बिंदू उरणमधील चिरनेर आहे. हा कॉरिडॉर मुंबई-अहमदाबाद महामार्गालाही जोडण्यात येणार आहे. यामध्ये आठ इंटरचेंज, २८ वाहन अंडरपास, १६ पादचारी अंडरपास आणि १२० कल्व्हर्ट असतील.*

### महानगरांसह अवजड वाहतुकीस फायदा

*हा मार्ग पूर्ण झाल्यावर परिसरातील ग्रोथ सेंटर, एमआयडीसी आणि वसई-विरार, ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, नवी मुंबई, उरण-पनवेल या महानगरांसह जवाहरलाल नेहरू पोर्ट, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास त्याचा मोठा लाभ होणार असून येथील प्रवासी आणि अवजड वाहतूक वेगवान होण्यास मदत होणार आहे.*

# फटाक्यांचा अनुत्पादक खर्च टाळा

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे कार्यशाळा



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, रबाळे शाखेतर्फे, 'फटाके फोडून, आनंद मिळतो का?' हे संवाद सत्र पार पडले. संवाद सत्र नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक शाळा क्रमांक १०४, राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालयामधील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते. बुधवारी (दि. १९) संवाद सत्र झाले.

संवाद सत्रात गजानंद जाधव यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. भारतात परंपरांना वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात अधिष्ठान आहे. त्यामुळे त्यांचे अंधानुकरण केले जाते. जसे की नरकासुराचा नायनाट केला, त्याचा आनंदोत्सव म्हणून फटाके फोडण्याची परंपरा सांगितली जाते. या परंपरेचा परिणाम म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास, ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण, माती प्रदूषण व पाणी प्रदूषण असा आहे. इतकेच नाही तर फटाके बनविण्याच्या कारखान्यातील बालमजुरीला आपण बळ देत असतो. या परंपरांना पायबंध घातला पाहिजे. या परंपरांना आर्थिक कंगोरा असल्याने भांडवलदार यांचे उदात्तीकरण करतात. सुजाण नागरिकांनी अशा अनुत्पादक खर्चाच्या परंपरांना पायबंध पाहिजे. फटाके फोडणे, हे सणांच्या समृद्धीमधे भर न घालता, अपघातासारख्या संकटांना सामोरं जायला लावते. म्हणून फटाक्यांचा अनुत्पादक खर्च टाळून दिवाळी साजरी करूया असा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.

मुख्याध्यापक अमोल खरसंबळे व शिक्षक अमोलकुमार वाघमारे यांच्या सहकार्याने संवाद सत्र खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले. संवाद सत्राला अशोक निकम यांनी सहभाग नोंदवला.

# भारतीय बनावटीच्या आकर्षक कागदी व कापडी कंदिलांना पसंती



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पुढील आठवड्यात दिवाळी सुरू होत असल्याने नागरिकांची खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये एकच गर्दी झाली आहे. आकाशकंदील, रांगोळ्या, लक्ष्मीदेवीच्या मूर्ती, पणत्या खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी होऊ लागली आहे. यंदा प्लास्टिक कंदील हद्दपार झाले असून भारतीय बनावटीचे आकर्षक कागदी, कापडी कंदील दाखल झाले आहेत. ग्राहकांकडून या कंदीलांना पसंती दिली जात आहे.

दिवाळीत सर्वत्र दीपोत्सव साजरा केला जातो. घराबाहेर पणत्या आणि आकाशकंदील लावले जातात. त्यामुळे दिव्यांबरोबरच आकाशकंदिलांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. बाजारात यंदा मोठ्या प्रमाणात कागदी आणि कापडी कंदील दाखल झाले आहेत. तर चिनी आकाश कंदील तुरळक प्रमाणात आहेत, मात्र ग्राहकांकडून आकर्षित स्वदेशी बनावटीचे असलेल्या पर्यावरणपूरक कंदिलांना प्राधान्य दिले जात आहे. गेल्या काही वर्षांपासून चायना मेड आकाश कंदील मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी येत होते. यंदा चिनी आकाश कंदील तुरळक प्रमाणात आहेत. देशी बनावटीच्या आकाश कंदीलांना यंदा चांगली मागणी आहे. कापडी कंदीलावर विणकाम आणि नक्षीकाम करण्यात आले असून विविध प्रकारच्या लेस लावून सजवाट करण्यात आली आहे. हे कंदील बाजारात २१० रु ते १६५० रुपयांपर्यंत आहेत. कागदी कंदील कार्ड बोर्ड पेपर आणि स्पंच तसेच लाकडी बॉर्डर लावून त्यावर विविध प्रकारचे चकमकीत रंगीबेरंगी मणी, मोती लावून सजावट करण्यात आलेले हे कंदील ५९० ते १२०० रुपयांवर आहेत.

**भेटवस्तूसाठी गिफ्ट बास्केट**

कोरोनामुळे दोन वर्ष दिवाळी अगदी साध्या पद्धतीने कोणाच्याही संपर्कात न येता साजरी करण्यात आली होती. तसेच खासगी मोठ्या कंपन्यांमधूनदेखील त्यांच्या कर्मचाऱ्यांना भेटवस्तू देण्याचे टाळले होते. यंदा आता गणेशोत्सवानंतर दिवाळीदेखील धुमधडाक्यात साजरी करण्यात येत आहे. त्यामुळे बाजारातही ग्राहकांचा खरेदीसाठी उत्साह दिसून येत आहे. सध्या बाजारात गिफ्ट बास्केटचा ट्रेंड आला आहे. आपल्या आप्तेष्टांना भेटवस्तू देण्यासाठी या गिफ्ट बास्केटला मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे. काळानुरूप गिफ्ट पॅकिंगमध्ये वेगवेगळे बदल झाले असून अधिक आकर्षित गिफ्ट पॅकिंग केले जात आहे. बाजारात सध्या गिफ्ट बास्केटची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. यामध्ये फायबर, लाकडी, तसेच बांबूच्या काड्यांपासून टोपली, मोठ्या परडी उपलब्ध आहेत. यामधून सुका मेवा, दिवाळी फराळ, चॉकलेटस विविध प्रकारचे बिस्किट्स आकर्षक पद्धतीने पॅकिंग करून भेटवस्तू देण्यासाठी गिफ्ट बास्केटची मागणी वाढली आहे, अशी माहिती विक्रेता सुरेश गोस्वामी यांनी दिली आहे.

# ड्रोन यंत्राद्वारे औषध फवारणी प्रात्यक्षिक

## चिरनेर येथील शेतकऱ्यांनी घेतला लाभ

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेरचे सरपंच बागायतदार शेतकरी संतोष चिर्लेकर यांच्या पोंडा येथील आंबा बागायतीवर उरण तालुका कृषी विभागाच्या वतीने शासनाने प्रथमच नव्याने साकारण्यात आलेल्या ड्रोन यंत्राचे आंबा बागायती पिकावरील संरक्षक औषध फवारणी प्रात्यक्षिक उपस्थित बागायतदार शेतकऱ्यांना मंगळवारी (दि. १८) दाखविण्यात आले.



या वेळी कृषी विभाग उरण तालुका व माऊली ग्रीन आर्मी महाराष्ट्र राज्य पर्यावरण समिती बारामती, गरूडा एरोस्पेस प्रायव्हेट लिमिटेड चेन्नई यांच्या संयुक्त विद्यमाने ड्रोनच्या सहाय्याने आंबा फळबाग पिकावर पिक संरक्षण औषध फवारणी प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमात माऊली ग्रीन आर्मी महाराष्ट्र राज्य पर्यावरण समितीचे जनसंपर्क अधिकारी महेंद्र किरनापुरे यांनी मार्गदर्शन केले असून, ड्रोन फवारणी केल्यावर काय काय फायदे होणार, पिकावर लागणाऱ्या किडरोग कसा लवकर आटोक्यात आणता येईल, या बाबत माहिती दिली. ड्रोन यंत्राला शासनाचे अनुदान असून, साधारण शेतकरी ४० टक्के, बि एस सी, अग्री ५० टक्के, सोसायटी, आत्मा गट ६० टक्के, एफपीओ कंपनी ७५ टक्के, आणि केवीके १०० टक्के असा असणार आहे. या कृषी विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी तालुका कृषी अधिकारी विश्वनाथ धवळ कृषी सहाय्यक निखिल देशमुख, चिरनेरचे सरपंच संतोष चिर्ले कर, आर. पी. भजनावले, पी.एल. धडके, सुषमा आंबूलगेकर, सुरज घरत, कविता ठाकूर, प्रफुल्ल खारपाटील, भास्कर ठाकूर, कृष्णा म्हात्रे, बळीराम परदेशी, जनार्दन म्हात्रे, अविनाश पाटील यांच्यासह चिरनेर परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

# नवी मुंबईत युवकाची हत्या

**नवी मुंबई :** कोपरखैरणे नोड येथे एका मैदानात युवकाचा मृतदेह आढळून आला आहे. बुधवारी (दि. १९) सकाळी प्रभात फेरीसाठी आलेल्या काही जणांनी मृतदेह पाहताच या बाबत पोलिसांना माहिती दिली. कोपरखैरणे सेक्टर २३ येथील भूमिपुत्र मैदानात एका युवकाचा मृतदेह आढळून आला. त्याच्या कडील कागदपत्रांवरून त्याची ओळख पटली असून साहिल शांताराम गोळे (वय १७, रा. कोपरखैरणे) असे त्याचे नाव आहे.

साहिल बारावीत शिकत होता. त्याची डोक्यात दगड घालून हत्या केल्याचे निदर्शनास आले आलेय. मृतदेह ताब्यात घेत वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे. ही हत्या कुणी व कशासाठी केली याबाबत तपास सुरू असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप तीदार यांनी सांगितले.

# आवरे-कडापे शाळेत पणती रंगकाम स्पर्धा



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील आवरे - कडापे येथील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील विविध कौशल्ये वाढीस लागावीत या अनुषंगाने मंगळवारी (दि. १८) उरण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्रार्थमिक शाळा कडापे येथे प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पणतीवरील रंगकाम व नक्षीकाम स्पर्धा झाली. या स्पर्धेचे आयोजन शाळेतील शिक्षकांनी केले होते. ह्या स्पर्धेत शाळेतील पहीली ते पाचवीचे सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले होते. शाळेचे मुख्याध्यापक हितेंद्र म्हात्रे व उपशिक्षक रमेश पाटील यांनी स्पर्धेचे गुणांकन करून विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन केले.

# उरण महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील अजिवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभाग तसेच श्री. गोपाळकृष्ण वाचनालय देऊळवाडी उरण यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. गोपाळकृष्ण वाचनालयात आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना ग्रंथालयात आयोजित पुस्तक प्रदर्षन दाखवण्यात आले.




कार्यक्रमाचे अध्यक्ष डी. एल.एल.ई. विभाग प्रमुख प्रा.व्हि.एस. इंदूलकर हे होते. त्यांनी वाचनाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांनी रोज काहितरी वाचण्याचा संकल्प करावा असे सांगितले. या वेळी ग्रंथालयाचे सचिव श्रीकांत श्रीकृशण वैषंपायन, ग्रंथपाल जिजा घरत, ग्रंथालय समिती सदस्य कल्पना गोगट, राजेश शहा आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

या वेळी विद्यार्थ्यांनी प्रकट वाचन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. पराग कारूळकर यांनी केले. तर प्रास्ताविक प्रा. डॉ. एच. के. जगताप यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत व परिचय प्रा. डॉ. डी. पी. हिंगमिरे यांनी तर आभार आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. डॉ.आर. चव्हाण यांनी व्यक्त मानले. आयोजन प्रा. हन्नत शेख, प्रा. मेघा रेड्डी व प्रा. पुजा गुप्ता यांनी केले. कार्यक्रमात मोठया संख्येने विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली.

## कविता वाचनाचाही कार्यक्रम

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, अखिल भारतीय साहित्य परिषद महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात कविता वाचन कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांनी मानवी आयुश्यातील कवितेचे महत्त्व प्रतिपादन केले व मानवाने साहित्याचे वाचन केले पाहिजे असे सांगितले. डॉ. नितीन केळकर (मुंबई), निकिता भागवत (मुंबई), पुंडलीक म्हात्रे (उलवे), प्रा. चिंतामण धिंदळे (फुंडे), राजेंद्र नाईक (उरण), प्रकाश ठाकूर (भेंडखळ), दौलत पाटील (पागोटे), मनोज ठाकूर (उरण) आदी कविंनी आपल्या विविध विशयांवरील कविता सादर केल्या. पर्यावरण, भूमिपुत्रांचे प्रश्न, निसर्ग, देशभक्ती, मानवता, गझल, प्रेमकविता इत्यादी विषयांना स्पर्श करणाऱ्या कविता कविंनी सादर केल्या व उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.



वाचाल तर वाचाल!

जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

**जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...**

वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण.

येत्या रविवारी, २३ ऑक्टोबर २०२२ रोजी वाचूया त्रिदिव, कर्जत येथील अनुपमा कुळकर्णी (सध्या वास्तव्य अमेरिका) यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.

# परतीच्या पावसाने भातपिकांचे नुकसान

**अलिबाग : प्रतिनिधी**



हातचे पीक गेल्याने शेतकरी हवालदिल

रायगड जिल्ह्यात परतीच्या पावसामुळे भातपिकांचे नुकसान झाले आहे. उभी भाताची पिके कोलमडली असून कापलेली पिके व भाताचे भारे पावसाच्या पाण्यात पसरले आहेत. त्यामुळे शेतकरीवर्गास मोठ्या नुकसानीस सामोरे जावे लागत आहे. हाती आलेले भात पीक हातातून गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. परतीच्या पावसाने विस्कळीत झालेल्या शेतीचे दृश्य सर्वत्र दिसत असून शेतकरी पाऊस थांबून सूर्यप्रकाशाची वाट पहात आहेत.

गेले दोन-चार दिवस पावसाने उघडीप दिल्याने तयार भातपिके कापून तसेच पिकांचे भारे बांधून शेतकऱ्यांनी झोडणी, मळणीची तयारी केली होती. मात्र अचानक परतीच्या पावसाने जोरदार दणका दिल्याने शेतात कापून ठेवलेल्या भाताची कणसे तसेच भाताचे भारे पावसाच्या पाण्यात भिजले. त्यामुळे शेतकऱ्यांचे पुरते नुकसान झाले आहे. तसेच परतीच्या पावसाने झोडपून काढल्याने तयार उभी पिके शेतातच कोलमडली असून दाणे भिजून त्यांना अंकुर फुटले आहेत.

यंदा परतीचा पाऊस उशिरा सुरू होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता. त्यामुळे पिके कापणीच्या अवस्थेत असतानाही शेतकरी वाट पहात राहिला. मागील चार ते पाच दिवसांपासून कडकडीत ऊन पडल्याने शेतकऱ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला होता. मात्र गेले काही दिवस संध्याकाळच्या सुमारास ढगांच्या गडगडाटासह येणाऱ्या पावसाने भातपीकाची धुळधाण करून टाकली. विशेषतः दक्षिण रायगडात महाड, माणगाव, पोलादपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना परतीच्या पावसाचा मोठा फटका बसला आहे.

परतीच्या पावसाच्या दणक्याने हाती आलेले उभे पीक वाया गेले असल्याचे शेतकरी वर्गाचे म्हणणे आहे.शासनाची यांची त्वरेने दखल घ्यावी व नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

# माणगाव उपजिल्हा रुग्णालयात केली जातेय रुग्णांची लूट

## युवासेनेचे विपूल उभारेंचे वैद्यकीय अधीक्षकांना निवेदन

**माणगाव : प्रतिनिधी**



(छाया : सलीम शेख)

येथील उपजिल्हा रुग्णालयात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून येथील डॉक्टर पैशाची मागणी करत असून, त्याबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. संबंधित डॉक्टरांची चौकशी करून त्यांच्यावर कायदेशिर कारवाई करावी तसेच त्यांनी रुग्णांकडून घेतलेले पैसे वसूल करून संबंधीत रुग्णांना परत करावेत, अशी मागणी युवासेनेचे दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख विपुल उभारे यांनी माणगाव उपजिल्हा रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. गोमसाळे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

माणगाव उपजिल्हा रुग्णालय हे मुंबई-गोवा महामार्गावरील महत्वाचे रुग्णालय आहे. या रुग्णालयात गोरगरीब, कष्टकऱ्यांवर तातडीने व योग्य उपचार केले जातात. मात्र या उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी येणाऱ्या महिला व त्यांच्या नातेवाईकांकडे पैशाची मागणी करून येथील डॉक्टर लुट करीत आहेत. त्याबाबतच्या अनेक तक्रारी युवासेनेकडे आल्या आहेत. रुग्णांकडून पैसे मागणाऱ्या डॉक्टरांची चौकशी करावी व त्यांच्याकडून ते पैसे वसूल करून संबंधीतांना परत द्यावेत. तसेच डॉक्टरांवर कायदेशीर कारवाई करावी, असे विपुल उभारे यांनी माणगाव उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

बाळासाहेबांची शिवसेनेचे माणगाव तालुका प्रमुख ॲड. महेंद्र मानकर, उपप्रमुख नितीन पवार, युवासेनेचे वैभव मोरे, योगेश बक्कम, तालुका सचिव जितेंद्र तेटगुरे, शहर प्रमुख सुनील पवार, शाखा प्रमुख स्वप्नील उभारे आदि मान्यवर या वेळी उपस्थित होते.

बाळासाहेबांची शिवसेना युवासेनेच्या शिष्टमंडळाने या निवेदनाच्या प्रती राज्याचे आरोग्यमंत्री, रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हा वैद्यकीय अधीक्षक, माणगाव तहसीलदार यांनाही दिल्या आहेत. दरम्यान, विपुल उभारे यांनी आमदार भरत गोगावले यांना प्रत्यक्ष भेटून, माणगाव उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी आलेल्या महिलांच्या नातेवाईकाकडून डॉक्टर १५ ते २० हजार रुपयांची मागणी करीत असल्याचे सांगितले.

**माणगाव उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांवर मोफत उपचार केले जातात. युवासेनेचे लेखी निवेदन जिल्हा वैद्यकीय अधीक्षकांकडे पाठवून या प्रकरणाची चौकशी केली जाईल. चौकशीअंती योग्य ती कारवाई करण्यात येईल.**
**-डॉ. गोमसाळे,**
**प्रभारी वैद्यकीय अधीक्षक,**
**माणगाव उपजिल्हा रुग्णालय**

आमदार गोगावले यांनी उपजिल्हा रुग्णालयाचे प्रभारी अधीक्षक डॉ. गोमसाळे यांना, दूरध्वनीवरून ज्या डॉक्टरांनी रुग्णांकडून पैसे घेतले असतील त्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी, अशा सूचना दिल्या आहेत.

# महिला लोकशाही दिनाबाबत प्रशासनाचे आवाहन

**अलिबाग : जिमाका**

महिलांचे प्रश्न तसेच समस्या सोडविण्यासाठी जिल्हास्तरावर महिन्याच्या तिसऱ्या, तर तालुकास्तरावर महिन्याच्या चौथ्या सोमवारी महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो.

सर्व स्तरातील समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होवून त्यांना न्याय मिळावा या दृष्टीने महिलांच्या तक्रारी, अडचणींची सोडवणूक करण्यासाठी व पीडित महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी महिला लोकशाही दिन राज्य, विभागीय, जिल्हा आणि तालुका पातळीवर राबविण्यात येतो.

रायगड जिल्हास्तरावर प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच तालुकास्तरावर प्रत्येक महिन्याच्या चौथ्या सोमवारी संबंधीत तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात सकाळी ११ वाजता महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या दिवशी सार्वजनिक सुटी आल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

महिला लोकशाही दिनात सहभागी होण्यासाठी समस्याग्रस्त व पीडित महिलांनी विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. महिला लोकशाही दिनाच्या तक्रारीबाबत अधिक माहितीकरिता जिल्हा परिविक्षा अधिकारी वाघमारे (भ्रमणध्वनी ९८३४७४६०६८) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी विनीत म्हात्रे यांनी केले आहे.

# वृक्षारोपणातून प्रदूषण नियंत्रण शक्य -डॉ. गांधी

## 'जेएसएस'कडून रायगडात एक हजार रोपांची लागवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

एक विद्यार्थी एक झाड या संकल्पने अंतर्गत जन शिक्षण संस्थान (जेएसएस) च्या रानमळा प्रशिक्षण केंद्र परिसरात बुधवारी (दि. १९) प्रशिक्षक व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. वृक्षारोपणातून प्रदूषण नियंत्रण करणे शक्य असल्याचे प्रतिपादन जेएसएसचे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी यांनी या वेळी केले.

जन शिक्षण संस्थान (जेएसएस) च्या रायगड जिल्ह्यातील सर्व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांमध्ये बुधवारी एक विद्यार्थी एक झाड ही संकल्पना राबविण्यात आली. या वेळी प्रशिक्षक व एक हजार विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून एक हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. रानमळा प्रशिक्षण केंद्र परिसरात कर्मचारी, विद्यार्थी व साधन व्यक्ती यांनी रोपे लावून मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला व ही रोपे जोपासण्याचा संकल्प केला. सर्व ग्रामस्थांनी वृक्षारोपण करावे, असे आवाहन जेएसएसचे संचालक विजय कोकणे यांनी केले. ॲड. नीला तुळपुळे, नरेन जाधव तसेच प्रतीक्षा चव्हाण, सुकन्या नांदगावकर, अजय पाटील, नवनाथ पोईलकर, भारती पोईलकर, हिमांशू भालकर, स्वराज नाईक, पियूष पाटील, तन्वी पाटील, प्रांजल पाटील आदि कर्मचाऱ्यांसह जेएसएसच्या व्यवस्थापक मंडळाच्या पदाधिकारी आणि विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.




# सामाजिक न्याय विभागाचा वर्धापन दिन उत्साहात

**अलिबाग : जिमाका**

समाज कल्याण विभागाच्या स्थापनेस १५ ऑक्टोबर रोजी ९० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्ताने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रायगड कार्यालयाच्या वतीने अलिबाग येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वसतिगृहात जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, व छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्याही प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.

सामाजिक न्याय विभागाची प्राथमिक माहिती कार्यालय अधीक्षक माधुरी पाटील यांनी उपस्थितांना दिली. त्यानंतर समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव यांनी सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती दिली. रायगड जिल्हा परिषदेचे प्र. जिल्हा समाज कल्याण अधिकारी नितिन मंडलिक यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सहाय्यक पोलीस निरिक्षक विजय महाजन यांनी नागरी हक्क संरक्षण योजनेसंबंधी माहिती दिली. उपजिल्हाधिकारी अरुण उंडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सेवा पंधरवडा कार्यक्रमाच्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर ज्येष्ठ नागरिक सेवानिवृत्त प्रा. जोगळेकर, भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेचे लाभार्थी, दिव्यांग लाभार्थी व वसतिगृह प्रवेशित यांचा पुष्पगुच्छ व पुस्तक देवून सत्कार करण्यात आला.

वसतिगृह प्रवेशित विजय रामा उघडे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर सेवानिवृत्त प्रा. जोगळेकर यांनी राष्ट्रपुरुषांच्या कार्याची महती सांगितली. समाज कल्याण विभाग सहाय्यक आयुक्त कार्यालय आणि जिल्हा जातप्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, मुलांच्या व मुलींच्या शासकीय वसतिगृहातील प्रवेशित या कार्यक्रमास उपस्थित होते. मानसी नागावकर हिने आभार मानले.

# सर्पमित्र संदीप घरत यांना साप पकडण्याचे साहित्य प्रदान



**मुरुड : प्रतिनिधी**

तालुका पत्रकार संघ, प्रसिद्ध छायाचित्रकार सुधीर नाझरे व सीसटॅग यांच्या संयुक्त विद्यमाने मुरूड येथील सर्पमित्र संदीप घरत यांना मंगळवारी (दि. १८) साप पकडण्यासाठी विशेष तंत्रज्ञान वापरून बनवलेली एक काठी, दोन रॉड व पिशवी प्रदान करून त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

साप पकडताना संदीप घरत यांच्या जीविताचे रक्षण व्हावे व साप सुरक्षित पकडावा, यासाठी त्यांना साप पकडण्याचे साहित्य देण्यात आले आहे, असे सुधीर नाझरे यांनी या वेळी स्पष्ट केले. सापांना मारू नका, असे आवाहन संदीप घरत यांनी केले. पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष मेघराज जाधव यांनी

वनखात्यांच्या मुरुडमधील विश्रामगृहात मंगळवारी सर्पमित्र संदीप घरत यांना साप पकडण्याचे साहित्य प्रदान करण्यात आले. या वेळी आंबोलीचे वनपाल संतोष रेवणे, पत्रकार संघाचे खजिनदार गणेश चोडणेकर, संजय करडे, महेश मानकर, हितेंद्र पंड्या, सुरेश सदरे उपस्थित होते.

## खाद्याचे प्रमाण कमी झाल्याने


# फणसाड अभयारण्यातील गिधाड संवर्धन मोहिमेस खीळ

**मुरूड : प्रतिनिधी**

मृत जनावरे हे गिधाडांचे मुख्य खाद्य आहे. मात्र या खाद्याची वाणवा भासत असल्याने मुरूड तालुक्यातील फणसाड अभयारण्यामधील गिधाड संवर्धन मोहिमेची गती मंदावली आहे.

गिधाडांचे संवर्धन व त्यांची संख्या वाढण्यासाठी फणसाड अभयारण्यात ग्रीन वर्क ट्रस्ट व अभयारण्याच्या माध्यमातून गिधाडांच्या आहार केंद्राची संकल्पना कार्यान्वित करण्यात आली आहे. यासाठी तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला पत्र देऊन, आपल्या हद्दीत मृत जनावरे असल्यास तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. परंतु गिधाडांच्या आहार केंद्राची संकल्पना सुरु झाल्यापासून एकही मृत जनावर मिळालेले नाही. मृत जनावरे मिळत नसल्याने गिधाडांना आवश्यक असणारे खाद्य पुरवता येत नाही. त्यामुळे फणसाड अभयारण्यात गिधाडांचा वावर कसा सुरु होणार हा प्रश्न निर्माण झाला आहे.

**मृत जनावरांच्या वासामुळे गिधाडे या परिसरात येणार आहेत व त्यांचा अधिवास वाढणार आहे. यासाठी जनजागृतीसुद्धा करण्यात आली आहे. मात्र अभयारण्यात गिधाडांचे आहार केंद्र सुरू झाल्यापासून एकही मृत जनावर मिळालेले नाही. गिधाडांचे खाद्य मिळवण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे.**
**-दिनेश भोपाळे,**
**अध्यक्ष, ग्रीन वर्क ट्रस्ट**



# शेतकऱ्यांनी किसान क्रेडिट कार्ड योजनेचा लाभ घ्यावा -गजेंद्र घाडगे



**पोलादपूर : प्रतिनिधी**

किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) च्या माध्यमातून शेतकऱ्यांना बी-बियाणे, खतं, कीटकनाशकं इत्यादी शेतीच्या कामांसाठी कर्ज दिले जाते. जे शेतकरी पी.एम किसान योजनेचे लाभार्थी आहेत, परंतु अद्याप कोणत्याही बॅंकेचे पीक कर्ज नसेल, अशा शेतकऱ्यांनी केसीसी कार्डचा लाभ घ्यावा, असे आवाहन बॅंक ऑफ इंडियाच्या पोलादपूर शाखेचे व्यवस्थापक गजेंद्र घाडगे यांनी केले.

पोलादपूर तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या वतीने देवपूर येथे क्रॉपसॅप अंतर्गत भातशेती शाळेच्या पाचव्या वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी गजेंद्र घाडगे उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत होते. शेतकऱ्याचे उत्पन्न, त्याच्याकडील जमीन, लागवडीखालील क्षेत्र किती आहे, यावरून शेतकऱ्याला केसीसी अंतर्गत किती कर्ज द्यायचे, हे ठरवले जाते, असे त्यांनी सांगितले.

केसीसी अंतर्गत शेतकऱ्याला तीन लाखांपर्यंत कर्ज दिले जाते. त्यापैकी एक लाख ६० हजार रुपयांपर्यंत विनातारण कर्ज दिले जाते, तर त्यापेक्षा अधिक कर्जासाठी तारण ठेवणे गरजेचे आहे. केसीसी कर्जावर सात टक्के व्याजदर आकारला जातो. पण, शेतकरी कर्जाची परतफेड वर्षभरात करणार असेल, तर व्याजदरात तीन टक्के सवलत दिली जाते. शेतमालाच्या विक्रीतून शेतकऱ्यांनी या कर्जाची परतफेड करणे अपेक्षित आहे, अशी माहिती गजेंद्र घाडगे यांनी या वेळी दिली.

कृषी सहाय्यक मनोज जाधव यांनी भात कापणी व मळणी करण्यासाठी कृषी यांत्रिकीकरण योजने अंतर्गत ५० टक्के अनुदानावर मिशनरी वापर करण्याविषयी मार्गदर्शन केले. मंडळ कृषी अधिकारी सुरज पाटील, गुरुमाऊली शेतकरी गट अध्यक्ष जगदीश महाडिक, सचिव महादेव शिंदे, माजी सरपंच गणपत महाडिक, प्रविण महाडिक, ज्ञानेश्वर पवार, विजय मोरे यांच्यासह शेतकरी या वेळी उपस्थित होते. कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे यांनी आभार मानले.

# म्हसळ्यात किल्ले उभारणी स्पर्धा

**म्हसळा : प्रतिनिधी**

दीपावलीचे औचित्यसाधून म्हसळा येथील गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठानने २१ ते २६ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत किल्ले बांधणी स्पर्धा आयोजित केली आहे.

किल्ले बांधणी स्पर्धेतील पहिल्या तीन विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. गड-किल्ल्यांच्या माहिती आणि पुस्तकांसाठी सार्वजनिक वाचनालय म्हसळा (९२०९५१४४९२) आणि स्पर्धेत सहभाग नोंदणीसाठी कौस्तुभ करडे (९८५०९१८१५०), विशाल सायकर (९२७१७२७२०३), संतोष कुडेकर (९४२०६५०५७२) किंवा संतोष उद्धरकर (७८७५८७१७७०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठान तर्फे करण्यात आले आहे.

# मुरूडच्या मेघा पवार यांना पीएचडी

**मुरूड : प्रतिनिधी**

ओपीजेएस विद्यापीठ चुरू राजस्थान येथे झालेल्या दीक्षांत समारंभात बामनडोंगरी (ता. मुरूड) येथील मेघा रामेश्वर पवार यांना डॉ. जोगेंद्र सिंह यांच्या हस्ते पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

मेघा पवार यांनी हिंदी विषयात पिता-पुत्री के स्नेहिल मनोभाव या विषयावरील प्रबंध ओपीजेएस विद्यापीठास सादर केला होता. विद्यापीठाने त्यास मान्यता देवून मेघा पवार यांना ही पीएचडी पदवी प्रदान केली. या वेळी व्यासपीठावर चौधरी ओमप्रकाश, डॉ. जोगेंद्र सिंह, डॉ.राजेश कुमार पाठक, डॉ. उपेंद्र सिंह आदी मान्यवर उपस्थित होते

पीएचडी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या ऑरनेट टेक्नोलॉजी प्रा. लि. कंपनीचे सीइओ राम भोजने व डायरेक्ट कुमुद भोजने, लेखक लक्ष्मीनारायण पयोधि, रेखा पयोधी, पवन तिवारी, मार्गदर्शक डॉ. दिग्विजय कुमार शर्मा यांचे मेघा पवार यांनी आभार मानले. पीएचडी पदवी प्राप्त केल्याबद्दल उपसरपंच अमर म्हात्रे यांनी मेघा पवार हिचा सत्कार केला.




(छाया : संजय करडे)

# श्रीलंकेने यूएईला गुंडाळले

## ‘करो या मरो’च्या सामन्यात मोठा विजय

**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत पात्रता फेरीतील सामन्यात श्रीलंकेने मोठा विजय मिळवून सुपर १२च्या आशा कायम ठेवल्या आहेत. श्रीलंकेला आपल्या पहिल्या सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यामुळे मंगळवारचा सामना त्यांच्यासाठी ‘करो या मरो’ असा होता. श्रीलंकेने १५३ धावांचे लक्ष्य ठेवून यूएईच्या संघाला अवघ्या ७३ धावांवर गुंडाळले.



यूएईने नाणेफेक जिंकून श्रीलंकेला फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. श्रीलंकेकडून सलामीवीर पथुम निशंका याने सर्वाधिक ७४ धावांची खेळी केली, तर कुसल मेंडिसने ३३ धावांची खेळी करून श्रीलंकेचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. या दोघांशिवाय कोणत्याच फलंदाजाला साजेशी खेळी करता आली नाही. अखेर श्रीलंकेने १८ षटकांत सहा बाद १५२ धावा केल्या. यूएईकडून कार्तिक मयप्पनने हॅट्ट्रिक घेतली, तर अयान खान आणि आर्यन लाक्रा यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

यूएईला सामना जिंकण्यासाठी २० षटकांत १५३ धावांची आवश्यकता आहे. यूएईच्या कोणत्याच फलंदाजाला साजेशी खेळी करता आली नाही. यूएईकडून एकाही फलंदाजाला २० धावांचा आकडा गाठता आला नाही. श्रीलंकेच्या गोलंदाजांनी सांघिक खेळी केली. दुष्मंथा चमीरा आणि वानिंदू हसरंगा यांनी प्रत्येकी तीन बळी टिपून यूएईच्या फलंदाजीची कंबर मोडली. महेश थेक्षानाने दोन, तर प्रमोद मधुशन आणि कर्णधार दासुन शनाका यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. यूएईचा संघ पूर्ण २० षटकेदेखील खेळू शकला नाही. १७.१ षटकांत यूएईचा संघ अवघ्या ७३ धावांवर सर्वबाद झाला.

**मयप्पनने रचला इतिहास**

यूएईचा युवा गोलंदाज कार्तिक मयप्पन याने यंदाच्या विश्वचषकातील पहिली हॅट्ट्रिक घेतली आहे. श्रीलंकेविरुद्ध मयप्पनने ही कामगिरी केली. ब्रेट ली (२००७), कर्टिस कॅम्फर (२०२१), वानिंदू हसरंगा (२०२१) आणि कगिसो रबाडा (२०२१) यांच्यानंतर टी-२० विश्वचषकात हॅट्ट्रिक घेणारा मयप्पन हा पाचवा गोलंदाज ठरला आहे.

# राष्ट्रीय कराटे चॅम्पियनशिपमध्ये ‘सीकेटी’च्या विद्यार्थ्यांचे सुयश

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयातील इंग्रजी प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी नॅशनल कराटे स्पर्धेत बाजी मारली आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या या चमकदार कामगिरीबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बुधवारी (दि. १९) विद्यार्थ्यांचा गुणगौरव केला.

वर्ल्ड फुनकोबी शोतोकान कराटेतर्फे नॅशनल ओपन कराटे चॅम्पियनशिपचे स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि. १६) खारघर येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत देशभरातून अनेक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.



स्पर्धेत सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी उज्ज्वल कामगिरी करीत सुवर्ण व रौप्यपदके मिळवून आपल्या शाळेच्या नावलौकिकात भर टाकली आहे.

या चॅम्पियनशिपमध्ये रौनक नाकटे, श्राव्या थळे, प्रणव कांबळे, आरव झोडगे, दिशांत जाधव, ईशा चव्हाण, विघ्नेश पाटील, अर्थ पांडव यांनी सुवर्णपदक, तर सुहम बहिरा, दक्ष सुरते यांनी रौप्यपदक पटकाविले आहे. कराटे चॉम्पियनशिपमधील यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गौरव करण्यात आले. या वेळी त्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# रामशेठ ठाकूर कॉलेजचे विद्यार्थी बनले फिफा वर्ल्डकपचे दर्शक


**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी १७ वर्षाखालील महिला फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेचा थरार अनुभवला. नेरूळ येथील डी. वाय. पाटील स्टेडियममध्ये स्पेन आणि चीन यांचा सामना विद्यार्थ्यांनी दर्शक बनून पाहिला.

महाविद्यालयातील विविध शाखांतील सुमारे १६० विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी फिफा वर्ल्डकप पाहण्याचा आनंद घेतला. महाविद्यालयातील विद्यार्थिनींमध्ये खेळाविषयी जागृती निर्माण करणे आणि त्यांना वेगवेगळ्या इन्डोअर व आउटडोअर गेम्समध्ये सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहन देणे हे उद्दिष्ट होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत येणाऱ्या काळात महाविद्यालयातील मुली राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर चांगली कामगिरी करतील, अशी आशा व्यक्त केली. सामन्यासाठी मोफत पासचे नियोजन महाविद्यालयाचे जिमखाना प्रमुख प्रा. प्रथमेश उदेकर व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा. प्रवीण पाटील यांनी केले तसेच प्रा. महेश धायगुडे प्रा. अविनाश जुमारे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत श्रीकांतची विजयी सलामी



**ओडेन्से : वृत्तसंस्था**

माजी विजेत्या किदम्बी श्रीकांतने हाँगकाँगच्या एनजी का लॉन्ग अँगसला चुरशीच्या लढतीत पराभूत करत डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेतील (सुपर ७५० दर्जा) पुरुष एकेरीची दुसरी फेरी गाठली.

श्रीकांतने जागतिक क्रमवारीत १४व्या स्थानी असलेल्या अँगसला ५६ मिनिटे चाललेल्या लढतीत १७-२१, २१-१४, २१-१२ असे नमवले. महिला दुहेरीत भारताच्या ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद जोडीने डेन्मार्कच्या ॲलेक्झांड्रा बो आणि ॲमालिए मागेलूंड जोडीला २१-१५, २१-१५ असे सरळ गेममध्ये पराभूत करत आगेकूच केली.

# आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत रौनक साधवानीला विजेतेपद

**ला नुशिया (स्पेन) : वृत्तसंस्था**



भारताचा ग्रँडमास्टर रौनक साधवानीने नऊपैकी आठ गुणांची कमाई करीत तिसऱ्या ला नुशिया आंतरराष्ट्रीय खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. नऊ फेऱ्यांअंती नागपूरचा रौनक आणि दुसऱ्या स्थानावरील खेळाडूमध्ये एका गुणाचे अंतर होते.

अखेरच्या फेरीत रौनकने स्पेनच्या ग्रँडमास्टर डॅनिल युफाला अवघ्या २० चालींमध्ये पराभूत केले. ग्रँडमास्टर कारेन ग्रिगोरयान (अर्मेनिया) आणि आंतरराष्ट्रीय मास्टर एर्नेस्टो जे फर्नांडेझ गुइलेन (क्युबा) यांनी सात गुणांसह अनुक्रमे दुसरे आणि तिसरे स्थान मिळवले. या स्पर्धेत सहभाग नोंदवणारा रौनक हा एकमेव भारतीय बुद्धिबळपटू होता आणि सलग दुसऱ्या वर्षी भारतीय खेळाडूने या स्पर्धेचे जेतेपद मिळविले आहे.

# मेस्सी, रोनाल्डोला मागे सारत करीम बेंझेमा गोल्डन बॉलचा मानकरी



**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फुटबॉल स्टार मेस्सी, रोनाल्डोला माग सारत फ्रान्सचा करीम बेंझेमा गोल्डन बॉलचा मानकरी ठरला आहे. करीम बेंझेमाला सोमवारी जगातील सर्वोत्कृष्ट फुटबॉलपटू म्हणून बॅलन डी’ओर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गेल्या वर्षी चॅम्पियन्स लीग आणि ला लीगामध्ये रिअल माद्रिदला यश मिळवून देणारा बेन्झेमा हा २४ वर्षांत प्रतिष्ठित पुरस्कार जिंकणारा पहिला फ्रेंच फुटबॉलपटू आहे.

फ्रान्सच्या एकूण पाच फुटबॉलपटूंनी आतापर्यंत ही ट्रॉफी जिंकली आहे. बेंझेमाने या घोषणेनंतर आपल्या आई आणि मुलालाही मंचावर आमंत्रित केले. झिदाननेच त्याला ट्रॉफी प्रदान केली. हा पुरस्कार मिळाल्यानंतर मला माझ्या कामाचा अभिमान वाटत असल्याचे बेंझेमा यांनी सांगितले. हे माझे बालपणीचे स्वप्न होते. माझ्याकडे दोन आदर्श आहेत झिदान आणि रोनाल्डो. मला विश्वास आहे की काहीही शक्य आहे, असेही तो म्हणाला.







# कबड्डी पंचांच्या शिबिरास प्रतिसाद



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या वतीने नुकतेच पालघर बोर्डी येथे दोन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले. कबड्डीच्या हंगामाची सुरुवात होत असताना पंचाना नियमांचे सखोल ज्ञान व्हावे व त्यांची पुन्हा उजळणी व्हावी या हेतूने हे शिबिर घेण्यात आले.

नवीन पंचांच्या ज्ञानात भर पडावी व निःपक्षपाती निर्णय देता यावेत हेदेखील उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून दरवर्षी अशा प्रकारे शिबिराचे आयोजन करण्यात येते. या वेळी पंचाना प्रत्यक्ष मैदानावर घेऊनदेखील मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिरात ८० पंचांनी सहभाग घेतला होता. शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र पंच समितीचे सदस्य विक्रम म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी जिल्हा संघटनेचे कार्योपाध्यक्ष शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त रामचंद्र जाधव, पालघरच्या सु. पे. हायस्कूलचे मुख्याध्यापक व माजी कबड्डी खेळाडू राजन सूरी, राज्य पंच समितीचे सदस्य सुहास पाटील आदी उपस्थित होते.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com